श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑगस्ट २०२३ | विशेषांक | खासगी वितरणासाठी | पाने २०

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर जयंती उत्साहात साजरी




*प्रमुख वक्ते प्रा. डॉ. शरद श्रीकृष्ण कुंटे आपले विचार व्यक्त करताना,*
*सभामंचावर डावीकडून : सौ. शरयू यशवंतराव, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. मानसिंगराव घाटगे आणि श्री. श्रीकांत पराडकर*

शनिवार, दि. २९ जुलै २०२९ रोजी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९२वी जयंती प्रतिवर्षाप्रमाणे बहुउद्देशीय सभागृह, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवण येथे साजरी झाली. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. शरद श्रीकृष्ण कुंटे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. वैद्यकीय संचालिका, डॉ. सुवर्णा पाटील, भ.क.ल. ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. मानसिंगराव घाटगे, शिक्षण संचालिका, सौ. शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्री. श्रीकांत पराडकर आदी मान्यवर या कार्यक्रमाला सभामंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख वक्ते आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. तत्पूर्वी प्रमुख वक्त्यांनी मान्यवरांसमवेत लो. टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्मारकस्थळी जाऊन त्यांना आदरपूर्वक पुष्पांजली वाहिली. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन केले. शिक्षिका सौ. अश्विनी खांडेकर यांनी सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक केले तर सौ. सोनाली जोशी यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली

डॉ. शरद श्रीकृष्ण कुंटे (एम.एस्सी., बी.एड., पीएच.डी )हे नौरोसजी वाडिया महाविद्यालयात रसायन शास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांचे सात शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय बौद्धिक प्रमुख, विश्व हिंदू परिषद - महाराष्ट्र प्रांत सहमंत्री, दहा विश्वस्त संस्थांचे विश्वस्त, हिंदुबोध मासिकाचे संपादक, एकता मासिक न्यासाचे विश्वस्त, विद्याभारती - पश्चिम क्षेत्र-अध्यक्ष आदी संस्थांमध्ये कार्यरत होते. आता डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळ आणि परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. विकासपुरुष नरेंद्र मोदी, पूजनीय सुदर्शनजी-जीवन चरित्र, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी चरित्र, कर्मयोगी अब्दुल कलाम अशा चरित्रग्रंथांसह विविध महत्त्वाच्या



लो. टिळकांच्या प्रतिमेला वंदन करताना प्रा. डॉ. शरद श्रीकृष्ण कुंटे




दीप प्रज्वलन करताना प्रा. डॉ. शरद श्रीकृष्ण कुंटे

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आध्यात्मिक विषयांवर एकूण एकोणचाळीस पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.

डॉ. सुवर्णा पाटील यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला.

यानंतर शाळा तसेच विविध वैद्यकीय शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांनी वालावलकरसाहेबांच्या स्फूर्तिप्रद जीवनाविषयी बोलून त्यांना आदरांजली वाहिली.

**सिद्धी शिंदे – ए.एन.एम.– द्वितीय वर्ष**

''....बी.के.एल.वालावलकर हॉस्पिटलमध्ये येऊन नर्सिंग शिकण्याचा माझा अनुभव उत्साही आहे. नर्सिंग विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि हॉस्पिटलमधील सर्वच कर्मचारी यांची वागणूक अत्यंत प्रेमळ आहे. आपल्या वागणुकीत संयम कसा ठेवायचा, पेशंटला धीर कसा द्यायचा, त्याची काळजी कशी घ्यायची हे येथे शिकायला मिळाले. अनेक कौशल्ये शिकायला मिळाली.



इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थिनींकडून ईशस्तवन

येथे केवळ नर्सिंगच नाही तर एम. बी. बी. एस., फिजिओथेरपी, डीएमएलटी इ. इतरही क्षेत्रे उपलब्ध आहेत. येथे राष्ट्रीय पातळीवर खेळ खेळले जातात. येथे सेंट्रल लायब्ररी असून त्याचा विद्यार्थ्यांना उपयोग होतो. हॉस्पिटलमध्ये विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल भरपूर अनुभवायला मिळते आणि त्यांचे कौशल्य वाढते.''

**अनय सप्रे –**

'सुप्रभातम् उपस्थिताः सर्वे सज्जनाः सादरं वन्दे । अहं अनयः, श्री वालावलकरमहोदयस्य अतुलनीयकार्यस्य विषये किञ्चित् वक्तुम् इच्छामि ।

श्रीसद्गुरू दिगंबरदासमहाराजः श्रीक्षेत्र-डेरवण इत्यत्र ईश्वरस्य कार्यस्य बृहत्परिमाणेन विस्तारं कर्तुं आरब्धवान् । सः तत् स्थानं अस्माकं सनातन वैदिक-आर्यधर्मस्य प्रमुखं केन्द्रं कर्तुं योजनां कुर्वन् आसीत् । श्री संत सितारामबुवा बालावलकर न्यासस्य माध्यमेन अन्नस्य उत्पादनं, वस्त्रदानं, निर्धनानाम् आश्रयः, निःशुल्क औषधानि, शिक्षायाः अनुकुलवातावरणस्य निर्माणं, विद्यालयेभ्यः सहायतां प्रदातुं शैक्षणिकसाहित्यस्य वितरणं, इत्यादयः विविधाः उपक्रमाः आरब्धाः । श्री दिगंबरदासमहाराजः अस्य विशालकार्यस्य कृते विशालवित्तीयशक्तिं निर्मातुं श्री वालावलकरमहोदयं नियुक्तवान्। यतः न्यासेन अतीव महती ऋणस्य राशिः उत्पन्ना आसीत् । यदि तत् न कृतं स्यात् तर्हि एतादृशं विशालं कार्यं कर्षितं स्यात् । अन्तेच अर्धमार्गे परित्यक्तं स्यात्, अतः एतस्य विशालकार्यस्य सम्पूर्ण दायित्वं कमलाकरपंत वालावलकरमहोदयं सः दत्तवान् । महोदयेन अपि एतत् दायित्वं अतीव प्रेम्णा अङ्गीकृतं स्वीकृतं च ।

भवननिर्माणकार्ये महोदयाय यः लाभः अभवत् सः एषः



*सिद्धी शिंदे*



*अनय सप्रे*



*सौ. गौतमी कांबळे*



*आकर्षा हेळेकर*

भक्तश्रेष्ठः श्रीमहाराजस्य चरणकमलयोः उपरि स्थापितवान् । बहुवारं तस्य परीक्षार्थं श्रीमहाराजः महोदयस्य आर्थिकसङ्कटस्य समये डेरवणक्षेत्रे किञ्चित् महत् कार्य प्रस्तावयति स्म । श्री महाराजः वदन्ति, वालावलकर यदि भवतः प्राप्यतायाम् अस्ति, यदि भवान् सम्यक् मन्यते तर्हि अस्माभिः एतद् उपक्रमं कर्तव्यम् । गुरोः वाक्यं प्रमाणं उक्तीनुसारं वालावलकरमहोदयः तत् कार्य समासिंयावत् नयन्ति स्म। अस्य एकमात्रं कारणं सद्गुरूश्रद्धा एव । श्रीमहाराजस्य मुखात् ये वचनानि आगतानि तानि पतितानि चेत् मम जीवनं व्यर्थ इति सः मन्यते ।

श्रीमहाराजस्य देहत्यागस्य कतिपयदिनानि पूर्वं तस्य दर्शनार्थ महोदयः पुण्यपत्तनं गतवान् आसीत् । श्रीमहाराजस्य दर्शनं गृहीत्वा तेन सार्धं चर्चा कृतवान् । वालावलकरमहोदयस्य गमनसमये ते उक्तवान्, अद्य अत्रैव तिष्ठ, मया सह किञ्चितकालम् उपविशतु । सदगुरोः आज्ञा शिरसावन्द्या, अतः महोदयः प्रस्थानं नाकरोत् । श्रीमहाराजस्य समीपमेव उपविश्य तेषां सेवायां महोदयः स्वर्गसुखस्य आनन्दम् अनुभवन् आसीत् । एतयोः सम्भाषणे श्रीमहाराजः तं पृष्टवान् – अयि कमलाकर! आगामीकाले त्वं विपुलं धनं प्राप्स्यसि । एतस्य धनस्य त्वं किं करिष्यसि ? क्षणमपि न चिन्तयित्वा महोदयः उक्तवान् – अहं तत् धनं निर्धनानां हिताय, तेषां कष्टानां दुःखानां निवारणाय उपयुज्यामि इति । शिष्योत्तमस्य एतद् उदघोषं श्रुत्वा श्रीमहाराजस्य नेत्राणि कृतज्ञतापूर्णानि अभवन् । श्रीमहाराजस्य कृपाप्रसादेन वालावलकरमहोदयः धन्यादयः अभवत् । परन्तु स्वप्रतिज्ञायाः ते कदापि न विचलितः अभवत् ।

महोदयः अनेकानां संस्थानां साहाय्यं कृतवान् परन्तु सः स्वयं श्रेयात् अनामिकः भवितुं प्रतिज्ञां पालितवान् । दुर्लभेषु यदि नामोल्लेखः अपरिहार्यः आसीत् तर्हि स्वस्य सद्गुरोः नामध्येयं दातुं सः आग्रहं कुर्वन्ति स्मं । एतादृशी सरल–शुद्ध–जीवनसारिणिः तथा अनन्यसाधारण गुरोः उपरि श्रद्धा आसीत् भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मणराव वालावलकर महोदयस्य । धन्यवादः ।''

**गौतमी कांबळे –**

'....जे अशक्य वाटतंय ते स्वप्न मला पाहायचंय. ज्या गोष्टीचा कोणी पराभव करू शकत नाही त्याला मला हरवायचंय. ज्या ठिकाणी धाडसी माणसे जाण्यास धाडस करत नाही त्या ठिकाणी जाऊन मला धावायचंय.

म्हणजे कसं असतं ना, एक आपल्यासारखाच सर्वसामान्य माणूस, साधं राहणीमान पण विचार मात्र उच्च, ध्येय मात्र मोठी, असेच आपले भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकरसर. त्यांच्याबद्दल बोलायचे म्हटले तर..

इतरांची सेवा करणे हीच देवाची सेवा आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता आणि म्हणूनच ते लोकांची नम्रपणे सेवा करण्यास सदैव तयार असत. एवढे सर्वगुणसंपन्न असूनपण त्यांनी त्या काळी एवढ्या ग्रामीण भागात हॉस्पिटल चालू केले. हॉस्पिटलला असणाऱ्या सर्व सुखसुविधा, स्वच्छ परिसर, येथे प्रत्येक झाडाची घेतली जाणारी काळजी व त्यातून होणारी निसर्गाची जोपासना, नवनवीन राबवण्यात येणारे उपक्रम तसेच योजना, मग त्या लहान मुलांसाठी, वृद्ध माणसांसाठी असोत किंवा गरोदर मातांसाठी असोत. प्रत्येक पेशंटला मिळणारे मनमोकळे आणि प्रसन्न वातावरण या सर्व गोष्टींमुळे त्यांची सेवा अगदी तळागाळापर्यंत पोहोचली.

खरं तर एखाद्या खेडेगावात शिक्षणाच्या एवढ्या सुखसोयी असणे अशक्यच. कोरोनाच्या काळात मेडिकल फील्डचे महत्त्व सर्वांनाच समजले आणि त्यामुळेच आता नर्सिंग कॉलेजला ॲडमिशन मिळणे खूपच कठीण झाले आहे. आणि खरंच मी स्वतःला खूप भाग्यवान समजते की मला समर्थ नर्सिंग कॉलेजला ॲडमिशन मिळाले.

घराच्या जवळच कॉलेज असल्यामुळे मला खूपच सोयीचे झाले आणि त्यामुळेच मी घरातील जबाबदारीसह माझे नर्सिंगचे स्वप्न पूर्ण करून शकणार आहे. तसे पाहायला गेले तर नर्सिंग कॉलेजेस खूप आहेत परंतु त्या कॉलेजला हॉस्पिटल अटॅच असणे खूप महत्त्वाचे असते आणि ती सुविधा आम्हाला येथे मिळाली.

आम्ही जे कॉलेजमध्ये वाचतो, जे शिकतो ते प्रत्यक्षात करण्याची संधी आम्हाला येथे मिळते. कारण कोणतेही यश गाठण्यासाठी प्रथम पाया मजबूत असावा लागतो. या वातावरणात मग ते कॉलेजला असो किंवा हॉस्पिटलला असो येथे असणारी शिस्त आम्हाला एक उत्तम नर्स होण्यासाठी प्रेरक ठरते. हरतऱ्हेचे पेशंट्स, डिसीजेस, कंडिशन्स बघायला मिळतात. त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत न डगमगता, शांतपणे पण विचार करून कृती करण्याचे गुण हे हॉस्पिटलमुळे व कॉलेजमुळे आमच्या अंगी आले आहेत.

इथे शिकणाऱ्या स्टुडंट्सना होस्टेलची सुविधा असल्यामुळे घरी पालकसुद्धा निर्धास्त असतात. नर्सिंगप्रमाणे अनेक कोर्सेस इथे उपलब्ध आहेत. मग ते टेलरिंगपासून ते अगदी एमबीबीएसपर्यंत! या सर्व कोर्सेसचा लाभ माझ्यासारखेच अनेक विद्यार्थी घेत आहेत.

तसेच कोर्स केल्यानंतर पुढे काय ? हा प्रश्न जरी पुढ्यात आला तरी हॉस्पिटल असल्यामुळे येथे जॉब करून मी स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभी राहू शकते. त्यासाठी कोठेही बाहेर गावी जाण्याची गरजच मला वाटत नाही.

त्याप्रमाणे घरातील कोणतीही व्यक्ती आजारी असली तरी मग तो आजार मोठा असो वा लहान, लांब जाण्याची गरजच पडत नाही. अशा सर्व सुखसुविधा तेही गावात मिळणे एक नवलच.

आयुष्य यशस्वी करण्यासाठी आणखी काय वेगळं करावं लागत नाही, एक कोरा करकरीत दिवस सूर्योदयाबरोबर आपल्याला बहाल करतो आणि रात्र म्हणजे कालचा फळा पुसून लख्ख करणारे डस्टर. मग त्या स्वच्छ फळ्यावर कालचेच धडे का गिरवायचे ? जो नव्याने दिवसाला सामोरा जातो तो नवा मजकूर लिहितो आणि तो मजकूर डोळ्यासमोर आदर्श ठेवून आम्ही एज्युकेशन घेत आहोत. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या एज्युकेशनला तसेच त्यांच्या भविष्याचा विचार करून एवढ्या चांगल्या सुविधा आम्हाला दिल्याबद्दल आम्ही सरांचे सदैव ऋणी राहू. धन्यवाद!''

**आकर्षा हेळेकर –**

'....myself Akarsha Helekar from class 10. Today on the birth Anniversary of Bhaktshrestha Kamlakarpant Walawalkar Saheb, I would like to share my own experiences about how I have been benefited because of his contribution towards the rural development and women empowerment.

By profession, Saheb was one of the very few reputed builder-industrialists of Mumbai. He maintained his unique position because of the virtues that he possessed. With the blessings of Shree Maharaj, he spared nothing in exerting his skills and knowledge and set his business on a strong foundation.

Shree Maharaj tested Shri Walawalkar Saheb from time to time for his selfless, humble and generous nature and then assigned to him the total financial responsibility of his various welfare projects and religious programs.

Shri Walawalkar Saheb gave his unstinted support (in terms of body, soul & wealth) to the cause of his preceptor Shree Maharaj who was carrying out selfless humanitarian service for the welfare of the poor people through the medium of Shree Sant Seetarambua Walawalkar Trust and Shree Vithalrao Joshi Charities Trust.

Now how am I benefited?

When I was five, I lost my father in a car accident in 2012 while coming to Ratnagiri from Mumbai. I have completed my primary schooling in Mumbai. When my mother decided to remarry, we shifted to Makhjan. My mother wanted me to learn in a school with quality education. When she searched for such an institute, she found Dervan English Medium School.

I joined the school in class 5, but as my village is far away from school, it was very difficult for me to travel and to concentrate on studies. I managed for the first 2 years but post corona period it became very difficult for me to manage things due to my family problems.

I was under stress and could not focus on my studies. My academic progress suffered, I lost my confidence, my absenteeism in school increased. School authorities noticed this decline. They took me into confidence and enquired about my problems. They suggested the perfect solution by offering me the Hostel facility immediately and convinced my mother.

Shifting to the school hostel solved all my problems as I came at the safe place and also saved my valuable time. Now I could concentrate on my studies and will be able to get good grades in Board Exams. I have experienced the safe and secured environment here at the SVJCT Campus and many other girls here must be feeling the same.

The confidence that I have gained today is only possible because of the benevolent Walawalkar Saheb. Today thousands of students have benefited from the facilities created here by Saheb. CBSE School, state-of-the-art Sports Academy, Medical College, Nursing College, Ultramodern Hospital and many health schemes for the poor. The quality of life of the people of this area has elevated in the last 30 years only because of the education, health and employment opportunities created here from the wealth of munificent Walawalkar Saheb.

Not only me but many others like me who face problems and are thinking to stop their education, Walawalkar Saheb is The Alchemist for all of us. Thank you. ''



श्रेया पाटेकर



गायत्री जोशी

**श्रेया पाटेकर – बी.एस्सी. (नर्सिंग) प्रथम वर्ष**

'....माझं बारावीपर्यंतचं शिक्षण सावर्ड्यातच झालं. बारावीपर्यंतचा रस्ता सरळ असतो. पण पुढचा मार्ग निवडताना प्रश्न येतो. खरंतर मी ठरवून या क्षेत्रात आले नाही. माझे आई–बाबा याच संस्थेत काम करतात. जर ही संस्था नसती तर माझ्या आई–बाबांना आणि अनेकांना शेती एवढा एकच पर्याय असता. या संस्थेने अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. वैद्यकीय क्षेत्रात भरपूर नोकरीच्या संधी आहेत असे माझ्या बाबांचे मत होते. त्यामुळे बारावीनंतर 'नीट'ची परीक्षा देऊन मी बी.एस्सी. (नर्सिंग)साठी प्रवेश घेतला. मला या कॅम्पसमधली सगळ्यात आवडलेली गोष्ट म्हणजे येथील स्वच्छता आणि शिस्त. मी पहिल्याच सेमिस्टरमध्ये असल्यामुळे मला 'क्लिनिकल ड्युटी'चा फार अनुभव नाही. पण जेवढे काम मी केले त्यावरून कळले की खेड्यापाड्यातील लोकांना उपचार उपलब्ध झाला आहे आणि शिबिरांमुळे अनेक लोकांना मोफत उपचार मिळतात. मी आरोग्यक्षेत्र निवडलं याचा आणि या कॉलेजमध्ये शिकण्याचा मला फार आनंद वाटतो.''

**गायत्री जोशी**

'....आपली गुरुशिष्यांची परंपरा पूर्वीपासून चालत आलेली आहे, उदा. श्रीराम आणि वसिष्ठ, पांडव आणि श्रीकृष्ण या सारखी अनेक उदाहरणे देता येतील. यासारखेच श्री दिगंबरदासमहाराज व कमलाकरपंत वालावलकर हे गुरुशिष्य नात्याचे एक उत्तम उदाहरण आहे. आज २९ जुलै. आपल्या रुग्णालयाचे संस्थापक श्री. कमलाकरपंत वालावलकर यांची जयंती. गुरू आणि शिष्य या दोघांमध्ये समर्पण आणि तळमळीची भावना असणे आवश्यक आहे, त्याशिवाय इच्छित उद्दिष्टे साध्य करता येत नाहीत.

स्वधर्म जोडले निजधन । जो करी सद्गुरूसी अर्पण ।
तोचि कर्मी निष्कर्म जाण । परम पावन तो एक ।।

असे एकनाथमहाराजांनी सांगितले आहे. या उक्तीप्रमाणेच श्री. कमलाकरपंत वालावलकरसाहेबांनी आपले सारे जीवन आपले गुरू श्री दिगंबरदासमहाराज यांच्या चरणी अर्पण केले. श्री दिगंबरदासमहाराजांनी आज्ञा करावी आणि श्री. वालावलकर साहेबांनी ती पूर्ण करावी हे त्यांच्या गुरुभक्तीचे प्रमाण आहे. यामुळेच वालावलकरसाहेबांना ''भक्तश्रेष्ठ'' ही उपाधी शोभून दिसते.

जेव्हा आपल्या रुग्णालयाची स्थापना झाली, त्या वेळी डेरवण हा अतिशय दुर्गम, कोणत्याही सोयीसुविधा नसलेला व फार कमी लोकसंख्या असलेला भाग होता. त्या काळी इथल्या लोकांकडे शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन नव्हते. त्यामुळे इथे अतिशय गरिबी होती व शैक्षणिक किंवा आरोग्य सुविधा नसल्याने लोक अज्ञानी व आजारांनी ग्रस्त होते.

जिथे लोकांकडे उदरनिर्वाहाची भ्रांत आहे, रस्ते, पाणी, वीज या सारख्या मूलभूत सुविधा नाहीत, अशा या डेरवणसारख्या ग्रामीण भागात श्री. कमलाकरपंत वालावलकर यांनी आपले गुरू श्री दिगंबरदासमहाराज यांच्या आज्ञेनुसार रुग्णालय उभारणीचे काम हाती घेतले. आणि हे सर्व उभे करून लोक येतीलच अशी शाश्वती नाही, तरीही कोणतीही शंका–कुशंका न घेता गुरुआज्ञा शिरसावंद्य मानून वालावलकरसाहेबांनी रुग्णालय उभारणीचे दिव्य व्रत स्वीकारले. १९९६ साली रुग्णालयाच्या एका इमारतीपासून सुरू झालेला सेवाप्रवाह आज सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यसेवेचा महासागर झाला आहे. इथे विविध प्रकारच्या आजारांनी ग्रस्त रुग्ण येतात. इथल्या नामांकित वैद्यकीय तज्ज्ञांकडून त्यांच्यावर उपचार केले जातात. अनेकांना विविध योजनांतर्गत माफक दरात उच्च दर्जाचे रोगनिदान व उपचार सुविधा पुरवल्या जातात. रुग्णालयातून कित्येक जण बरे होऊन हसतमुखाने घरी जाताना आम्ही पाहतो.

रुग्णसेवेसोबतच इथे रोजगाराभिमुख शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेत समर्थ नर्सिंग कॉलेज, कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज, समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, फिजिओथेरपी व वैद्यकीय महाविद्यालय यासारख्या उच्च शिक्षणाच्या सुविधा दिल्या जात आहेत. माझ्यासारखे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

मी ॲडव्हान्सड् डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे. आम्हाला उच्चशिक्षित शिक्षक, प्रशिक्षित तंत्रज्ञ यांच्याकडून प्रशिक्षण मिळते. याव्यतिरिक्त वैद्यकीय महाविद्यालयाच्या उच्चविद्याविभूषित तज्ज्ञ प्रध्यापकांचे मौल्यवान मार्गदर्शनदेखील मिळते. पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनेक वैद्यकीय केसेस पाहायला मिळतात. प्रत्यक्षात अनेक अद्ययावत तंत्र उपकरणे फक्त पाहायलाच नव्हे तर हाताळायला मिळतात.

इथे प्रवेश मिळविणे व शिक्षण घेणे हे माझ्यासारख्या कित्येक विद्यार्थ्यांचं स्वप्न असतं. या संस्थेचा विद्यार्थी म्हणून बाहेर समाजात आम्हाला एक मानाचं स्थान मिळतं. आम्हालाही या






*अथर्व देशपांडे* *प्रीती कारंडे*

संस्थेचा विद्यार्थी असण्याचा अभिमान वाटतो. पहिल्यांदा जेव्हा इथे प्रवेश घेतला तेव्हा सुरुवातीस थोडे दडपण होते. मग नंतर जशीजशी शिक्षणाला सुरुवात झाली, शिक्षकांची व तंत्रज्ञांची ओळख झाली त्यानंतर खूप छान वाटू लागले. आता असं जेव्हा मला कोणी विचारतं की तू कुठे असतेस? काय करतेस? तेव्हा मी सांगते की मी इथे वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज' येथे शिक्षण घेत आहे, तेव्हा या हॉस्पिटलबद्दल लोकांमध्ये असलेली प्रसिद्धी आणि विश्वास पाहून खूप छान वाटतं. तेव्हा खरोखरच अभिमान वाटतो की आपण एवढ्या मोठ्या संस्थेचा एक छोटासा भाग आहोत याचा.

माझ्यासारखे शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांना संस्थेतच नोकरी मिळाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना बाहेरच्या नामांकित शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये नोकरी मिळाली आहे. तसेच काही विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लॅब, ब्लड बँक, डाएट क्लिनिक व डायलिसीस सेंटर सुरू केले आहेत.

पारंपरिक शिक्षणातून भरपूर विद्यार्थी मिळवून नफा मिळवता येत असतानादेखील, व्यावसायिक शिक्षण देऊन रोजगारदेखील उपलब्ध करणारी ही एकमेव अशी संस्था असावी. आणि हे सर्व शक्य झाले आहे ते इथे रुग्णालय उभारण्याची दिव्य दृष्टी असलेल्या सदगुरू श्री दिगंबरदासमहाराज व त्यांचे हे स्वप्न साकार करणाऱ्या वालावलकरसाहेबांमुळेच.

समाजाला आरोग्य व शिक्षणातून आत्मनिर्भर बनवण्याचे दालन उभे करणाऱ्या या गुरुशिष्यांना मी शतशः नमन करते व माझे दोन शब्द संपवते. धन्यवाद!''

**अथर्व देशपांडे –**

'..२०१८ साली येथे आल्यावर हा परिसर ज्यांनी निर्माण केला, त्यांच्याबद्दल जाणून घ्यायची उत्सुकता होती. तीच उत्सुकता मला इथवर घेऊन आली आहे. आज श्री कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९३वी जयंती ! डेरवणवासीयांसाठी हा दिवस सणच आहे. साहेबांचा जन्म १९३०साली वालावल येथे झाला. अतिशय हलाखीच्या परिस्थितीवर मात करीत त्यांनी यशाचे शिखर गाठले. या प्रवासात त्यांना श्री दिगंबरदासमहाराज यांचे आशीर्वाद लाभले. इंग्रजीत म्हणतात, 'व्हेन गोइंग गेट्स टफ, दि टफ गेट्स गोइंग' ही म्हण साहेबांनी सार्थकी लावली. महाराजांच्या आज्ञेमुळेच साहेब गृहनिर्माण व्यवसायात उतरले. लोकांना परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध करून दिली. ते स्वत: छोट्या घरात राहायचे. असा साधेपणा दुर्मीळच. लोकांसाठी ते विश्वकर्मा होते. १९९५साली महाराजांच्या इच्छेसाठी साहेबांनी डेरवणला दवाखाना बांधायला घेतला. पण थोड्याच अवधीत त्यांचे निधन झाले. आपण त्यांच्या वाटेवर चालून या परिसराचा अजून विकास करू या.''

**प्रीती मधुकर कारंडे – बी.पी.टी.एच. वर्ष पहिले**

'..आपण महामानवांच्या जयंत्या का साजऱ्या करतो तर त्यांच्या महान कार्याचा, विचारांचा अनुभवाचा आढावा घेऊन, त्यांच्या पाउलखुणांवर चालले पाहिजे. वालावलकरसाहेबांनी अनेक अडचणींवर मात करून सावर्ड्यासारख्या खेडेगावात मेडिकल कॉलेज काढले. तसेच लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना शाळा सुरू केली. एक प्रशस्त हॉस्पिटलही सुरू केले. या गावातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. हे हॉस्पिटल ते शहरातही उभारू शकले असते, पण सर्वसामान्य लोकांसाठी, गरिबांसाठी, शेतकऱ्यांसाठी ते ग्रामीण भागात सुरू केले. त्यामुळे कित्येक चांगले डॉक्टर्स येथे आले. एक चांगला डॉक्टर बनविण्याआधी एक चांगली व्यक्ती त्यांनी या मातीतून बनविली आहे. या महान कार्याचा सारांश असा, ''छाटले जरी पंख माझे, पुन्हा उडेन मी । अडवू शकेल मला अशी अजून भिंत नाही । विझलो जरी आज मी । हा माझा अंत नाही । पेटेन पुन्हा नव्याने । हे सामर्थ्य नाशवंत नाही ।'' या महान कार्याला माझे लाख लाख धन्यवाद!''

**कल्याणी हलदर – बी.एस्सी. (नर्सिंग) तृतीय वर्ष**

'....मला नर्सिंग प्रशिक्षणाची प्रेरणा देणारे व मला सदैव आशीर्वादीत करणारे माझे परमपूज्य गुरू वालावलकरसाहेब यांच्या चरणी विनम्र अभिवादन करते. समाजाला आरोग्य प्राप्त होण्यासाठी ग्रामीण भागात काम करणारी आमची संस्था अहोरात्र कार्यरत असते. मुळची या गावचीच असल्यामुळे या संस्थेची प्रगती मी पाहिलेली आहे. ही संस्था सुरू होण्यापूर्वी या गावामध्ये अतिशय कमी सुविधा होत्या. फक्त शेती आणि मोलमजुरी हेच येथील लोकांचे व्यवसाय होते. पण आता या संस्थेमुळे अनेक लोकांना केवळ वैद्यकीयच नव्हे तर अनेक क्षेत्रात रोजगार उपलब्ध झाले आहेत. ही एक सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था आहे. अनेक परिचारिका या

संस्थेतून घडल्या. आज त्या समाजाप्रति समर्पित व्यक्ती म्हणून काम करीत आहेत. वालावलकर हॉस्पिटल मला आधारवृक्ष वाटते कारण माझ्या जडणघडणीमध्ये संस्थेने मोलाचे सहकार्य केलेले आहे. ते शब्दात सांगणे कठीण आहे.

मी एका गरीब कुटुंबातील मुलगी आहे. वडिलांचे छत्र गेल्यावर मला व माझ्या आईला या संस्थेने वडिलांसारखा आधार दिला. माझ्या भावंडांनीही वैद्यकीय शिक्षण याच संस्थेतून घेतले. आज ते 'झेन' आणि 'एम.जी.एम.'सारख्या नामांकित रुग्णालयात कार्यरत आहेत. स्वावलंबी झाले आहेत. मला वैद्यकीय क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा याच संस्थेतून मिळाली. माझ्यासारख्या अनेक गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण, कर्मचाऱ्यांना रोजगार व अनेक रुग्णांना उत्कृष्ट व अल्प दरात आरोग्यसेवा या संस्थेमुळे प्राप्त झाल्या आहेत. भविष्यात एक कर्तव्यदक्ष परिचारिका म्हणून सामाजिक बांधिलकी जपण्यास मी सदैव कटिबद्ध राहीन. या संस्थेची आणि वालावलकर साहेबांची मी आजन्म ऋणी राहीन.''

**साक्षी खानोलकर**

'....आपलं संपूर्ण आयुष्य दिगंबरदास महाराजांच्या चरणी समर्पित करणाऱ्या भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांची आज जयंती आहे. साहेबांविषयी दोन शब्द बोलण्याची मला संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजते. साहेबांचे चरित्र नजर खालून घालताना माझ्या अल्पबुद्धीला जे काही कळलं ते मी तुम्हा सर्वांना सांगू इच्छिते.

प्रत्येकाला वाटत असतं आपण नावलौकिक कमवला पाहिजे. पण त्यासाठी जे लागतं, ते या चरित्रात आहे, म्हणजेच यशाची किल्ली.

सद्गुरूंची अखंड कृपादृष्टी व पाठबळ असूनही साहेबांनी परिश्रमात व चिकाटीत यत्किंचितही कसूर ठेवली नाही. एखादे काम जे सर्वसामान्य माणसाला नक्कीच अशक्य वाटेल त्यात साहेबांना मात्र एक टक्काच काय एक शतांश जरी ते काम होण्याची शक्यता दिसली तर निराश न होता चिकाटीने शेवटपर्यंत ते त्या कामाचा पिच्छा पुरवायचे. शेवटपर्यंत जीव पणाला लावूनसुद्धा एखादे काम झाले नाही तरच ते काम होण्यातले नव्हते हे त्यांना पटायचे. अन्यथा एखादे काम त्यापूर्वी अशक्य या सदराखाली ढकलायला ते कधीच तयार नसत.

साहेब कर्मयोगी तसेच मानवतावादाचे उपासक होते. त्यांची नोकरी सुरळीतपणे चालू असतानादेखील, त्या काळात लोकप्रिय होत चाललेल्या शब्दकोड्यांच्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला आणि नुसताच भाग घेतला नाही तर शब्द शोधण्यासाठी साहेबांनी पोती भरभरून पुस्तके खरेदी केली आणि अशा चिकाटीने साहेबांनी त्या


साक्षी खानोलकर


कल्याणी हलदार

काळात पाच-पन्नास हजार रुपये मिळवले.

नोकरीच्या काळातील अनुभवाच्या जोरावर त्यांनी आपल्या एका नातेवाइकासह भागीदारीमध्ये बांधकाम व्यवसाय सुरू केला, बांधकाम व्यवसाय या अत्यंत आव्हानात्मक, खर्चिक आणि अनेक सरकारी तसेच गुंड प्रवृत्तीने भ्रष्टाचाराने ग्रासलेल्या क्षेत्रातही साहेबांनी सचोटीचा व्यावसायिक म्हणून नावलौकिक मिळवला. त्यांनी कधीच चुकीचा मार्ग निवडला नाही. जे लोकहितासाठी आहे तेच काम त्यांनी केलं.

ते मानवतेची सेवा हीच ईश्वरपूजा या मताचे होते. त्यांनी लोकांच्या मुलींच्या लग्नाला तसेच गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली. अनेक शाळा, संस्था, मंदिरांना त्यांनी मदत केली पण त्यांनी कधीही आपलं नाव प्रसिद्ध करण्यास अनुमती दिली नाही.

यशस्वी व्यावसायिक असूनही साहेबांची राहणी साधीच राहिली. ते त्यांच्या जुन्या तीन खोल्यातच अखेरपर्यंत राहिले. चटईवर झोपत असत आणि साधं शाकाहारी भोजन घेत असत. म्हणूनच त्यांचे गुरू श्री दिगंबरदासमहाराज यांनी त्यांना 'हिमालयातील तपस्वी' असे नाव दिले.

प्रयत्नांती परमेश्वर ही म्हण त्यांनी सत्यात उतरवून दाखवली. आपण प्रयत्नवादी झालो तर परमेश्वर आपल्या मदतीला येणारच हा विश्वास मला त्यांच्या चरित्रातून मिळाला. तर साहेबांच्या चरित्रातून आपण हे शिकलं पाहिजे की आपण ज्या गोष्टीकरिता इथे आलो आहोत त्यात आपण आपले शंभर टक्के योगदान दिले तर त्यातूनच आपल्या बुद्धीला चालना मिळेल की आपल्याला पुढे नक्की काय करायचं आहे. ते असंच चमत्काराने घडेल अशा विचारात न राहता आपण सतत प्रयत्नशील राहिलं पाहिजे. आपण त्यांनी उभारलेल्या कॉलेजमध्ये शिकत आहोत म्हणून हे योगदान देणं हे आपलं कर्तव्य मी समजते.

स्वतः वालावलकरसाहेबांनी त्यांच्या भाषणाच्या शेवटी देवाकडे जे मागणं केलं तेच मागणं मागून मी माझं भाषण थांबवते. 'अंती एकची विनवणी । सेवा घे मजकडुनी ।। विसर न पडावा




*अवनीश जाधव आणि सानवी चव्हाण*




*राधा पाटणकर आणि समर्थ हेंबाडे*

तुझा मनी । ठाव सदा दे चरणी ।। सकल ही सद्भक्ता सुखवाया । दासोद्धार कराया येई, येई ओ ।''

**सानवी चव्हाण आणि अवनीश जाधव (इयत्ता आठवी)–**

"...We bow down to the soul of Bhaktshreshtha Kamlakarpant Walawalkar Saheb and pay respect on behalf of Spanish batch.

Saheb, all your institutions are growing leaps and bounds day by day and it has one more feather in the cap.

The Institute has started 4 more courses under National Skill Development Corporation. These courses enable rural empowerment and community health.

The response was encouraging and these courses were inaugurated in April 2023. The duration of these training courses are approximately 150 hours. The training is conducted 6 days a week.

All successful candidates will be awarded with a certificate. Our German batchmates will share more details of these courses. ''

**राधा पाटणकर आणि समर्थ हेंबाडे**

"..Good morning respected Prof. Kunte,

With our heartfelt respect we continue with the courses offered under National Skill Development Corporation.

Successful candidates will get certificates. They will also get a job card. These certificates and job cards are recognised all over India and in other 23 countries. These courses are Tailoring and Fashion Designing, Computer Training, Beauty Parlour course and General Duty Assistant. These courses and their benefits will be a boon for rural population. People have already completed the courses and we are sure many more will avail this facility.''

**निधी सातपुते–अक्षया तांदळे**

"....Good morning, I, Nidhi and Akshaya have been studying in this institute for the past 4 to 5 years, but a few days ago I was asked to give this speech that's when I started reading about Bhaktashreshtha Shree Kamalakarpant Laxman Walawalkar and out of all his spiritual journey, His journey as a disciple of Shree Digambardas Maharaj, is something that inspired me the most. I can't really fit all of his accomplishments in this speech, but I really hope that in the next few minutes, I will be able to convey the abilities of a real disciple to help you understand that no greatness, no great success can be achieved without the help of a spiritual guide.

1977 - 78 was the year when Shree Digambardas Maharaj selected Dervan for expansion of his life purpose on a larger scale. Through Walawalkar Charitable Trust basic amenities such as food, clothes, shelter, free medicines were provided to the poor and needy. He did not stop there. He even provided scholarships, distributed books and bags, supported the schools buildings. School buildings were built with the foresight to be useful in future. As a result the oppressed masses got employment at a fair rate.

Rome was not built in a day and neither was this Institute. Raising such an Empire takes a lot of hard work, time and huge amount of money as well, which is not an easy task. That is when Shree Digambaradas Maharaj entrusted the performance of raising funds and repaying all the loans on to Walawalkar saheb to which he happily abided. This trust was built because of the beautiful bond that they shared.

अनेक वेळा श्रीमहाराज साहेबांची परीक्षा घ्यायचे. ते म्हणायचे वालावलकर तुमच्या आवाक्यात असेल, तुम्हाला योग्य वाटत असेल तर आपण हा उपक्रम हाती घेऊ! आणि त्या वेळी जरी साहेबांना पैशांची अडचण असली तरी त्यांनी महाराजांचा शब्द खाली पडू दिला नाही. लगेच ते मान हलवून कामाला लागायचे. आणि मजेची गोष्ट म्हणजे अनेक वेळेला असे व्हायचे, महाराज जेवढी रक्कम मागायचे तेवढीच रक्कम साहेबांजवळ असायची. हे सांगण्याचा उद्देश असा की साहेबांचा महाराजांवरती अतूट विश्वास होता आणि असा विश्वास तेव्हाच स्थापित होतो जेव्हा आपल्याला कळते की समोरच्याच्या सांगण्यातच आपले भले आहे.




निधी सातपुते आणि अक्षया तांदळे




श्री. विनायकराव पराडकर

There were many such incidences which reflect the qualities of a real disciple, which was few days before the demise of Shreemaharaj when Saheb visited him in Pune and had the following conversation.

''अरे कमलाकर, तुला आता खूप अमाप पैसा मिळणार आहे बरं का! पण एवढ्या पैशाचे तू करणार काय ?'' त्यावर साहेब निःसंकोचपणे एका श्वासातच बोलले की तो सारा पैसा गरिबांच्या कल्याणासाठी त्यांचे कष्ट, दुःख निवारण करण्यासाठी मी वापरीन आणि त्यांनी त्यांचा शब्द खरा केला.

After Maharaj's demise, Saheb kept his word even when he reached the pinnacle of wealth, he did not deviate from his promise. Maharaj had told him, if you earn a Rupee, spend 12 anna of it on the community, but Saheb's charity was never restricted to a certain amount.

Saheb has helped many organizations but he himself kept a vow to remain nameless. In rare cases if naming was an avoidable, Saheb would insist on giving the name of his own Sadguru.

These incidences do prove what great disciple he was, as he accepted his Guru's life mission as his own, worked day and night tirelessly throughout his life to achieve it.

I really hope that you have provoked a thought in your brain which inspires you to be not just good doctors but also good human beings because that is surely a need of the hour."

**विनायकराव पराडकर –**

अध्यक्ष महोदय, व्यासपीठावरील व समोरील आदरणीय मान्यवर आणि सर्व श्रोत्यांना नमस्कार.

माझ्या पूर्वपुण्याईने मला श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामीसमर्थ महाराजांचा २१ वर्षे सहवास लाभला. ते देहाने नसले तरी चैतन्य रूपाने येथेच आहेत. आपल्या शिष्यांकडून सर्व कार्य करून घेत आहेत. त्यामुळे हा भव्य प्रकल्प साकारला आहे. महाराजांचे १९४२ सालापासून वहाळकरबुवांना भेटण्यासाठी डेरवणला येणेजाणे होत असे. त्यांचे विषेश कार्य सन १९६९पासून श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट व श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट स्थापन करून सुरू झाले ते अखंड आजपर्यंत चालू आहे. संतलोक जेथे वास्तव्य व कार्य करतात त्या स्थानाचा उत्कर्ष होतो.

मी प्रथम १९७२ साली श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिराच्या वास्तुशांतीसाठी आलो. त्या वेळी डेरवण एक खेडेगाव होते. इलेक्ट्रिसिटी नव्हती. सावर्डे फाटा ते डेरवणगाव कच्चा रस्ता होता. रात्री सगळीकडे अंधार. बाहेर जायला भीती वाटायची. गावकरी लोक कंदील व हातात छोटी काठी घेऊन यायचे. टॉर्च नव्हते. विहिरीवर ऑइल इंजिन पंप सेट होते. निवासस्थान कौलारू होते.

आता सर्व चित्र पालटले आहे. शहरात मिळणार नाही अशा सुविधा झाल्या आहेत. २४ तास पाणी व इलेक्ट्रिसिटी आहे. साहेबांच्या हस्ते १९९५ साली रुग्णालयाच्या प्रकल्पाचे भूमीपूजन झाले. त्या वेळी येथे नुसते माळरान, 'शेरीचा माळ' होता. आता हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, स्टाफ क्वार्टर्स, होस्टेल, शाळा, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स इत्यादी होऊन ५५, ५६ इमारती झाल्या आहेत. एक छोटे गाव वसले आहे.

आपल्या परंपरेतील सर्व संतांनी कर्मयोग आचरला व साहेबांनी महाराजांबरोबर राहून तोच मार्ग अनुसरला. 'महाजनो येन गतः स पंथः ।' म्हणजे मोठे लोक ज्या मार्गाने जातात तोच खरा मार्ग असतो. डेरवणहून सावर्डे चिपळूणला जायचा मार्ग असा त्यांचा अर्थ नाही. तर ते जीवन ज्या पद्धतीने वागले तो मार्ग. महाराजांनी आयुष्यभर लोकांच्या कल्याणासाठी कार्य केले. लोकांना भक्तिमार्गाला लावले. साहेबांनी आपले सर्व जीवन सद्गुरूंच्या चरणी अर्पून ते जसे सांगतील त्याप्रमाणे वागले.

वालावलकरसाहेबांना मी प्रथम पुण्यातील श्रीसद्गुरू बाबामहाराजांच्या मंदिरात १९७० साली पाहिले. त्यांच्याबरोबर मालूताई व लहान विकासराव होते. ते मंदिरात दर्शन घेऊन महाराज

जेथे बसले होते तेथे त्यांच्या दर्शनास आले. प्रसन्न व्यक्तिमत्व, बोलणे-चालणे बघून हे कोणीतरी मोठे ऑफिसर असावेत असे वाटत होते. ते महाराष्ट्र सरकारच्या 'अकाउंट्स जनरल' ऑफिसमध्ये ऑफिसर होतेच. त्या वेळी माझे वय वीस वर्षे होते. साहेब आमच्यापेक्षा वीस वर्षांनी तरी मोठे होते पण ते आमच्या सगळ्यांशी बोलताना 'अहो-जाहो' म्हणायचे. पुण्यातील मंदिरातील उत्सवांना ते नेहमी येत असत व सर्व कार्यक्रमात सहभागी होऊन पालखीत नाचतही असत. मंदिरात श्रीसद्गुरू बाबामहाराजांचा जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो, त्या वेळी उत्सवाची भाजी आम्ही चार-पाच जण जाऊन सायकलला दोन्ही बाजूला पिशव्या लावून तीन किलोमीटर लांब मंडईतून आणत असू.

साहेब उत्सवाला आले की आम्हाला आनंद होत असे. कारण ते येताना मोटार घेऊन येत व उत्सवाची भाजी आम्ही त्यांच्या मोटारीतून आणत असू. त्या वेळी पुण्यातील मंदिरात येणाऱ्या भक्तांपैकी कोणाकडेच मोटार नव्हती. सगळेच सायकल स्वार! भाजी खरेदी झाल्यावर साहेब भाजीच्या पिशव्या उचलायला लागायचे. नको म्हटले तरी द्या द्या म्हणायचे. पण आम्ही त्यांना घेऊ देत नव्हतो.

महाराजांचे साहेबांकडे बारकाईने लक्ष असे. मुंबईला त्यांना मोटरसायकलवरून जाताना अपघात होऊन पाय दुखावला. महाराजांनी पत्र लिहून पुढील सूचना केल्या. ''यापुढे आपण मोटर सायकल चालवू नये. एक बेबी कार घ्या. चालविण्यास शिका. व्हेईकल ॲक्ट वाचा. साईन पाठ करा. यापुढे मोटरसायकलचा वापर चुकूनही करू नका.'' साहेबांनी त्यांची सूचना तंतोतंत पाळली.

तसेच समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन स्थापून बांधकाम व्यवसाय सुरू केल्यावर प्रत्यक्ष कामाच्या जागी जाऊन माहिती घेण्यास सांगितली. जमीन मोजणी, प्लिंथ चेकिंग, लेआउट मार्किंग इत्यादीसाठी ते स्वतः सरकारी व कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांबरोबर जात असत. त्या वेळी त्यांना खाकी शर्ट, खाकी पॅन्ट, निळा टाय व पिन, बूट असा वेश करण्यास सांगितला होता. त्याप्रमाणे ते काही दिवस हा पेहराव करून साइटवर जात असत.

रविवार, दि. १० सप्टेंबर १९९५. सकाळी सप्रेगुरुजी, फडकेगुरुजी, काका, साहेब व मी आम्ही पंधरा-वीस जण आळंदीला नृसिंहसरस्वती मंदिर व ज्ञानेश्वरमहाराज समाधिमंदिरात दर्शनाला गेलो होतो. समाधीच्या महापूजेस काका व गुरुजी बसले होते. गाभाऱ्यात जागा नसल्यामुळे आम्ही सर्व मंदिराच्या सभा मंडपात बसलो होतो. नंतर साहेब आले. बसले. म्हणाले छातीत थोडी जळजळ होते, म्हणून थंड पेय घेऊन आलो. आमच्यातील कोणीतरी छताकडे बघून म्हणाला, ''या एवढ्या मोठ्या दगडी तुळया वर कशा बसवल्या असतील.'' लगेच साहेब म्हणाले की आपल्या पूर्वीच्या कारागिरांची भूमिती इतकी पक्की होती; लाईन, ओळंबा आणि अंतर कधीही चुकत नसे. चौथरा बांधून झाला की खांब उभे करायचे व खांबांच्या मध्यापर्यंत जमिनीपासून माती भरायचे, म्हणजे 'रॅम्प' करायचे व त्यावरून तुळया आणायचे व बसवायचे. खांब ओळंब्यातून हटला नाही ना याकडे त्यांचे लक्ष असायचे मग हेमाडपंथी मंदिराची रचना असते त्याप्रमाणे दगड बसवायचे. संपूर्ण मंदिर उभारल्यावर कोरीव काम करून झाले की वरून खाली-खाली माती काढत यायचे. एवढी त्यांना बांधकामाची माहिती होती. हे आमच्याशी त्यांचे शेवटचे बोलणे झाले.

सन १९९१. मुंबई गिरगाव चौपाटीवरील 'वाघ फाईन आर्ट स्टुडिओ'मधून श्रीसद्गुरू बाबामहाराजांची मूळ पंचधातूची मूर्ती पुण्यात आणायची होती. त्यासाठी मी, बाळासाहेब काजरेकर, अरुण मिराशी असे चार-पाच जण गेलो होतो. साहेबांनी स्टुडिओत येऊन वाटेत पोलिसांनी अडवू नये म्हणून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली व आम्ही दादरला त्यांचे घरी गेलो. आमच्या सर्वांची जेवणाची व्यवस्था त्यांच्या घरीच केली होती. मूर्ती आणण्यासाठी मेटॅडोरमधील मागील दोन सीट काढून गादी व चादर घालून मूर्ती ठेवली होती. मूर्तीजवळ आम्ही बसलो होतो. आमच्या गाडीमागून साहेब त्यांच्या कारमधून येणार होते. मूर्ती पाहताच मीपण याच गाडीतून येतो म्हणाले. लगेच बूट, सॉक्स काढून मागील कारमध्ये पाठवले व मांडी घालून बसले व पुण्यास आले. अशी त्यांची अनन्य भक्ती होती.

साहेबांना भक्तश्रेष्ठ ही बिरुदावली कोणी व कधी दिली त्यासाठी गीताईचे पुढील श्लोक म्हणतो. गीताई अध्याय सात, श्लोक १६ व १७ असे आहेत,

'भक्त चौघे सदाचारी भजती मज अर्जुना । ज्ञानी तसेची जिज्ञासू
हितार्थी आणि विव्हल ।।१६।। ज्ञानी वरिष्ठ सर्वात नित्य युक्त
अनन्य जो । अत्यंत गोड मी त्यास तोही गोड तसा मज ।।१७।।'

ज्ञानी भक्त कोण हे आपल्यासारख्या लोकांना कळणे अवघड आहे. ते संतच जाणू शकतात. सांगलीचे संत श्रीसद्गुरू दादामहाराज केळकर यांच्या सहवासात अनेक वेळा साहेब येत असत. त्यांची अनन्य भक्ती पाहून साहेबांना त्यांनी 'भक्तश्रेष्ठ' ही बिरुदावली सन १९९१मध्ये दिली व तेच नाव आपण आपल्या रुग्णालयाला दिले आहे. यावरून आपण बोध घेऊन कसे वागले पाहिजे हे कळण्यासाठी, त्यांच्या आठवणी सांगून आदर्श घेण्यासाठी त्यांची जयंती साजरी करतो व करायची असते.

**शरयू यशवंतराव, शिक्षण संचालिका –**

.. ५ सप्टेंबर ही तारीख जशी आपल्याला शिक्षकदिन म्हणून लक्षात राहते, १४ नोव्हेंबर हा बालदिन म्हणून लक्षात राहतो, तशी २९




सौ. शरयू यशवंतराव – शिक्षण संचालिका

जुलै ही तारीख आपल्यासाठी फार महत्त्वाची आहे. कारण डेरवण आणि आजूबाजूच्या गावांचा, आपला विकास करणारे भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांचा हा जन्मदिवस आहे. भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर म्हणजे अनेक सद्गुणांचे साकार स्वरूप. नि:सीम गुरुभक्ती, नि:स्वार्थी सेवा, परोपकार, नम्रता, कर्तव्यनिष्ठा, मेहनतीपणा – किती गुणांचा समुच्चय! कोणत्याही गुणाचे नाव घ्यावे, तो त्यांच्यात दिसून येतो. अशा व्यक्ती सामान्य नसून कुणी योगी सत्पुरुषच असतात. म्हणूनच तर सद्गुरू श्रीदिगंबरदासमहाराज त्यांना 'हिमालयातला योगी' म्हणत. सद्गुरू श्री दिगंबरदासमहाराजांमध्ये साहेबांनी प्रत्यक्ष परमेश्वर पाहिला. त्यांच्यावर त्यांचे इतके प्रेम होते की त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट त्यांनी नि:संशय हाती घेतली. नि:स्वार्थी सेवा, परोपकारी वृत्ती हे साहेबांचे सर्वात मोठे गुण. आध्यात्मिक उंची गाठण्यासाठी नि:स्वार्थी सेवा अत्यंत आवश्यक पायरी आहे. अतिशय योग्य म्हटलेले आहे की When faith replaces doubt, when selfless service eliminates selfish striving, the power of god brings to pass his purposes. जेव्हा शंकांची जागा श्रद्धेने व्यापली जाते, जेव्हा स्वार्थबुद्धीला नि:स्वार्थी सेवा नष्ट करते, तेव्हा तेथे इश्वरी शक्ती प्रकट होते. आणि म्हणूनच हे इश्वरी कार्य उभे राहिलेले आहे.

संस्थेने उपलब्ध केलेले नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि व्यावसायिक शिक्षणाच्या संधींचा लाभ आपण सर्व विद्यार्थी घेत आहात. अनेक विद्यार्थी येथे शिक्षण घेऊन स्वावलंबी झाले आहेत. काही पुढील शिक्षणासाठी परदेशीही गेले आहेत. आपल्या संस्थेतील दर्जेदार शिक्षणामुळे हे शक्य झाले आहे. तुमच्या कार्यातून तुम्ही साहेबांचे नाव मोठे कराल ही अपेक्षा आहे.

इतिहासात, पुराणात अनेक परोपकारी महापुरुषांची नावे आपण वाचतो पण आपण तर प्रत्यक्ष अशा महापुरुषाच्या नि:स्वार्थी सेवेचा अनुभव घेत आहोत. आपले काहीतरी सुकृत आहे म्हणून आपण या संस्थेशी जोडले गेलो आहोत.

एक माणूस म्हणून, समाजाचा एक सदस्य म्हणून, कुटुंबाचा सदस्य म्हणून आणि ईश्वराची निर्मिती म्हणून आपले काही कर्तव्य आहे. सर्व कर्तव्ये आपल्यासाठी अनिवार्य आहेत. काही देवाने आणि इतर मनुष्याने नेमून दिलेली आहेत. आपण मानवाने दिलेली सर्व कर्तव्ये पाळतो पण देवाने दिलेली टाळतो. त्यामुळे आपला समाज भ्रष्ट झाला आहे. मानवतेची नि:स्वार्थ सेवा हे ईश्वराने दिलेले कर्तव्य आहे. ते जर आपण केले तर आपला आणि विश्वातील लोकांचा उद्धार होईल. हे देवाचे कर्तव्य साहेबांनी पाळले म्हणून समाजाचा विकास होत आहे. कोणताही माणूस जन्माने नाही तर त्याच्या कर्माने मोठा होतो. रिकाम्या हाताने आलो आहोत, रिकाम्या हातानेच जाणार आहोत. सोबत राहील आणि मागे उरेल ते फक्त आपले कर्म! तेव्हा अशा कर्तृत्वाने श्रेष्ठ असलेल्या भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांना वंदन करते.

**डॉ. सुवर्णा पाटील , वैद्यकीय संचालिका –**

'... साहेबांचीच जयंती का असते विचारले तर – आपण संकटाचे स्वागत करायला हवे. संकटे आपल्याला थांबवायला येत नाहीत. अडथळे निर्माण करायला येत नाहीत तर ती आपली क्षमता वाढवायला येतात. जसे ह्या परिसरूपी संकटांचा स्पर्श झाला की जीवनाचे सोने होते हेच जणू काही साहेबांनी स्वतःच्या जीवनयात्रेतून सिद्ध केले आहे. सातत्य, चिकाटी, आणि गुरूंवरील नितान्त आणि अभेद्य श्रद्धा ह्याचा उत्तम समन्वय साधून ओसाड जमिनीवर ज्यांनी नंदनवन साकारले असे हे साहेब!

जसं एखाद्या दगडावर पाण्याची संतत धार कोसळत राहिली तर तो पाषाणसुद्धा दुभंगतो तेव्हा ते सामर्थ्य त्या पाण्याच्या बिंदूत नसून त्या सातत्यात आहे. अगदी त्याचप्रमाणे साहेबांवर आलेल्या अनेक संकटांवर त्यांनी धाडस, चिकाटी, सातत्य दाखवून मात केली आणि वाळवंटात विश्व निर्माण करण्याचा पराक्रम करून दाखवला आहे.

स्वामी विकेकानंद यांनी म्हटलेच आहे "In a day if you don't come across any problem, you can be sure that




डॉ. सुवर्णा पाटील – आरोग्य संचालिका

you are travelling in the wrong path." वालावलकरसाहेबांचं जीवन असंच होतं. पण सद्गुरूंवरती निर्लेप श्रद्धा, अपार विश्वास आणि निष्ठा, जशी एखाद्या तान्ह्या बाळाची त्याच्या आईवर असते, अगदी तशीच साहेबांची भक्ती आपल्या गुरूंवर होती आणि म्हणूनच एवढ्या भक्तांमधून त्यांनाच 'भक्तश्रेष्ठ' हे बिरुद जोडलं गेलं आणि म्हणूनच त्यांचा वाढदिवस हा जयंती उत्सव झाला.

कबीरजींनी म्हटले आहे, ''शिष्य तो ऐसा हो जो गुरु को सबकुछ दे और गुरु तो ऐसा हो शिष्य का कछु ना ले ।''

पण त्यांच्या सद्गुरूंनी मात्र त्यांचा अहंकार संपूर्णपणे घेतला होता आणि म्हणूनच ते भक्तांमधील श्रेष्ठ झाले. त्यांचे जीवनचरित्र आम्हाला असेच मार्गदर्शन करीत राहो आणि त्यांच्यातील एकतरी गुण आमच्यात आत्मसात होओ, हीच महाराजांच्या चरणी प्रार्थना.

**प्रा. डॉ. शरद कुंटे –**

'..कार्यक्रमाच्या अगदी प्रारंभी दीपप्रज्वलन केलं आपण. या ठिकाणी काही छोट्या विद्यार्थ्यांना कदाचित प्रश्न पडेल, की हे एवढे दिवे लागलेत, हजारो कॅण्डल पॉवरचा प्रकाश पडलाय, मग ते छोटे दिवे लावायची काय गरज आहे? समई प्रज्वलित करून वेगळं काय होणार आहे? या ठिकाणी विजेच्या दिव्याची आणि त्या समयीच्या दिव्याची एक छोटीशी तुलना या निमित्ताने मला मुद्दाम सगळ्यांच्या समोर मांडायची आहे. विजेचा दिवा हा एखाद्या सरकारी नोकरासारखा असतो आणि समईतील जी ज्योत आहे ती एखाद्या कार्यकर्त्यासारखी असते. म्हणजे काय?

सरकारी नोकर त्याला जेवढं काम दिलं जातं तेवढं करणार, तेवढ्या वेळेत करणार, त्याच्यापलीकडे भानगडीत पडणार नाही. समजा जर त्याच्याकडे एखादा मोठा प्रकल्प आहे. काय शेकडो कोटी रुपये त्याच्याकडे येत असतील. तो खर्च करत असेल. सगळेच्या सगळे खर्च करत नाही. त्यातले काही नाहीसे होतात. तसं त्या विजेच्या दिव्याचं आहे. त्याला जेवढी बाहेरून ऊर्जा मिळेल तेवढाच प्रकाश तो देतो. सगळा देत नाही. काही ऊर्जा त्यातली खर्च होते, वाया जाते. इफिशियन्सी कधीही एक नसते. त्यापेक्षा नेहमी कमीच असते. याचाच अर्थ काही ऊर्जा वाया जात असते. या समयीच्या दिव्याचं मात्र लक्षण पूर्ण वेगळे आहे. तो अमक्याच वेळात काम करेल, अमकाच वेळ काम करेल. असं त्याच्यावर काही बंधन नाही. बाहेरून त्याला ऊर्जा मिळाली पाहिजे, याच्यावर तो अवलंबूनच नाही. स्वतःची ऊर्जा देऊन तो जळत राहील. जोपर्यंत त्याच्याजवळ स्वतःची काही ऊर्जा शिल्लक आहे तोपर्यंत तो प्रकाश देत राहील.

विजेचा दिवा जो असतो, त्याचा आणखीन एक दोष आहे. तो दिवा दुसऱ्या दिव्याला प्रज्वलित नाही करू शकत. किती का मोठ्या कॅण्डलपॉवरचा इलेक्ट्रिक बल्ब असू दे. तो दुसऱ्या इलेक्ट्रिक बल्बला प्रज्वलित करू शकत नाही. ती त्याची मर्यादा आहे. पण समईची जी ज्योत आहे ना त्याच्यामध्ये हे विलक्षण सामर्थ्य आहे की तो दुसरा दिवा प्रज्वलित करू शकतो. तशाच ताकदीने आणि अशी दिव्यांची मालिकाच्या मालिका तयार करण्याचं त्याच्याजवळ सामर्थ्य असतं की जे कार्यकर्त्याचे लक्षण आहे. आणि असं समईसारखं तेवणारं, जगाला प्रकाश देणारं, आपल्याजवळ जे आहे ते सगळं समर्पित करायची इच्छा असणारं, एका अर्थाने आपलं जीवन असं व्हावं अशी इच्छा समई प्रज्वलित करत असताना आपण परमेश्वराजवळ व्यक्त करत असतो. माझं जीवन असं व्हावं. यांत्रिक, तांत्रिक, मला दिलं तेवढ्यापुरतं फक्त काम करीन, बाजूला होईन, त्यातलं जेवढं मला देता येईल तेवढं देईन, बाकीचं मी स्वतः गिळंकृत करीन, असं जीवन मला नको. मला स्वतःचं पूर्ण जीवन समर्पित करायचं आहे. त्याचं प्रतीक म्हणून हे दीप प्रज्वलन आपण करतो.

हे जे आतापर्यंत अनेकांनी सगळं वर्णन सांगितलं ना साहेबांचं ते असंच तेवणाऱ्या ज्योतीसारखं वर्णन आहे की आपल्या आयुष्यात जळत राहणे. कणकण जाळून जळत, क्षण क्षण... स्वतःचे जीवन हळूहळू संपवत राहिले. त्यांच्या भोवताली त्यांच्या आजूबाजूला, जेवढा आदेश दिला होता तेवढ्या क्षेत्रामध्ये प्रकाश निर्माण करत राहिले. स्वतः प्रसिद्धीच्या मागे लागले नाही, मोठेपणाच्या मागे लागले नाहीत पण काहीतरी निर्माण करून गेले. एक आदर्श भक्त म्हणून त्यांचं वर्णन सर्वांनी केलं आहे.

आदर्श भक्त मानला जातो भगवान हनुमान. एक आदर्श भक्त असावा तर हनुमानासारखा. स्वतःमध्ये अचाट ताकद असताना, क्षमता असताना रामासमोर सदैव नतमस्तक राहणारा, रामाचा कुठलाही शब्द खाली पडू न देणारा, रामाने जी काही इच्छा व्यक्त केली असेल, त्याचा मतितार्थ समजून राहिलेल्या गोष्टी आपल्या आपण पूर्ण करणारा! प्रत्येक गोष्ट विचारायला नाही गेले रामाला की, ही गोष्ट अशी करू का, तशी करू का? मग आता लंकेत गेलेत, सीता सापडत नाही.. मग, आता कुठे शोधू? मग अमुक ठिकाणी असेल का, मग ती खरी असेल का खोटी असेल? विचारायला गेले नाहीत रामाला! त्यांनी आपला आपला मार्ग शोधून काढला आणि त्याप्रमाणे सीतेचा शोधही लावला. सीता निष्कलंक आहे, स्वतःची खात्री पटवून घेतली, रावण तिला कसा त्रास देत होता, सगळ्या गोष्टींची स्वतः माहिती घेतली आणि इतकंच नव्हे तर लंकेचे दहन करून राक्षसांची ताकद किती आहेत तीही आजमावून परत आला! शिष्य असावा तर असा. पण त्याचे दुसरेही रूप आहे. एक आदर्श भक्त म्हणून जसा हनुमान आहे तसा एक आदर्श महाबली म्हणूनसुद्धा त्याचे रूप आहे, की जे पार रावणाविरुद्धच्या युद्धामध्ये

त्याने द्रोणागिरी पर्वत उचलून आणण्यापासून जे काही त्यानं केलं त्यामुळे लक्षात आलं. वालावलकरसाहेबांच्या जीवनामध्ये ही दोन्ही अंग प्रत्ययाला आली. श्रीमहाराजांच्या समोर त्यांचा शब्द झेलणं याच्या पलीकडे अमुक होईल का, तमुक करता येईल का?

म्हणजे त्यांचं चरित्र जे मी वाचलं त्यामध्ये अनेकदा 'मला एवढ्या पैशाची आता गरज आहे. तू मला आणून दे. इतक्या बँकांच्याकडून कर्ज घेतलं की त्यांच्याकडून देणे शिल्लक होतं. आता कसं आणता येईल हा विचार नाही केला. ते सतत नवीन माणसं शोधत राहिले, वेगवेगळ्या मार्गाने, पण गुरूंची इच्छा त्यांनी शेवटपर्यंत पडू दिली नाही खाली! म्हणूनतर शेवटी होईल तसे सदैव त्यांच्या पद्धतीने ते कृती करत राहिले. आणि त्यातून विश्व निर्माण केले. त्या हनुमानाचे प्रमाण आहे की त्यांनी द्रोणागिरी उचलून आणला. तसाच द्रोणागिरी खरोखरच इथं निर्माण केला. एखाद्याचं कर्तृत्वाचं मोजमाप करायचं कसं ? मोठेपणा एखाद्याचा कशाच्या आधारावर मोजता येतो? अनंतराव काणेकरांचा एक खूप सुंदर लघुनिबंध आहे. अनंतराव काणेकर अतिशय नामवंत अशा प्रकारचे साहित्यिक. लघुकथा, लघुनिबंध अशा माध्यमातून त्यांनी समाजजागरणाचं काम केलं. त्यांचं कुठलंही लिखाण हे करमणूक एवढ्यापुरतं कधी नसायचं, समाजजागरणाचा त्यांचा प्रमुख हेतू असायचा.

एक सुंदर लघुनिबंध आहे त्यांचा. ते म्हणाले, ''मी शाळेत शिकत होतो, पहिली-दुसरीमध्ये. त्या वेळी आमच्या बाई शिकवायच्या की अरे दोनातून दोन वजा केल्यावर शून्य राहतं. दहातून दहा वजा केल्यावर पण शून्यच राहते.'' मग त्यांनी कधीतरी विचारलं की बाई हजारातून हजार वजा केल्यावर किती राहतील? 'शून्यच राहणार !' बाई विश्वासाने सांगत होत्या. बाईंनी त्यांना विचारलं की तुला काय वाटतं ? मग अनंतराव म्हणाले, ''मला वाटतं दोनातून दोन वजा केल्यावर लहान शून्य आणि हजारातून हजार वजा केल्यावर मोठं शून्य राहील. ते लहान किंवा मोठं असेल, सारखं नाही असणार.'' ते म्हणतात की माझं म्हणणं बाईंना कधी पटलं नाही पण आता इतकं मोठं झाल्यावर, जीवनाचा इतका मोठा अनुभव घेतल्यावर अनंतराव म्हणतात की आता मला खात्री पटली की मी ते त्या वेळी म्हणत होतो तेच बरोबर होतं की दोनातून दोन वजा केल्यावर लहान शून्य असेल आणि हजारातून हजार वजा केल्यावर मोठं शून्य असेल. मग त्यांनी त्याची वेगवेगळी उदाहरणे दिली. त्यांनी सांगितलं की एक भिकारी आहे. तो दिवसभर भिक्षा मागतो. एक दहा रुपये मिळवले त्याने. दहा रुपयांची भीक मागून त्याने रात्री वडापाव खाल्ला. शेवटी त्याच्याकडे काय राहिलं? शून्यच! आधी शून्य होतं नंतरही शून्यच राहिलं पण त्या भिकाऱ्याचं कर्तृत्व किती ही बेरीज वजाबाकी करताना? दहा रुपयेच. जेवढे त्याने मिळविले तेवढेच त्याने खर्च केले. शेवटी शून्य राहिलं.

एखादा व्यापारी आहे गडगंज की हजारो पोती त्याच्याकडे रोज येतात. हजारो पोत्यांचा तो व्यवहार करतो. विक्री करतो. म्हणजे पोत्यांच्यामध्ये असणारं सगळं धान्य, त्याची किंमत लक्षात घेतली तर काही कोटी रुपये तो रोज मिळवतो आणि कोटी रुपये तो खर्च करतो म्हणजे शेवटी त्याच्याकडे कदाचित शून्यच राहत असतील. पण त्याचं कर्तृत्व शून्य नाही. ते कोटी रुपये त्यांनी जमविले आणि खर्च केले हे त्याचं कर्तृत्व आहे. आणि पुढे अशी उदाहरणे देत अनंतराव शेवटी जीवनाच्या तत्त्वज्ञानाकडेच येतात की कुठलाही मानव असो, कुठलीही संस्था असो, कुठलाही समाज असो; या विश्वाचे निश्चितपणे हेच सत्य आहे की प्रत्येक व्यक्ती येताना शून्यच घेऊन येणार आहे आणि जीवनाच्या शेवटी शून्यच राहणार आहे. पण त्याच्या जीवनाचे मोठेपण मोजायचे कशात? तो शून्य राहिला याच्यात नाही मोजायचे, तर ते शून्य मिळवण्यासाठी काय मिळवलं आणि काय खर्च केलं, काय निर्माण केलं आयुष्यात याच्यावरती ते मोठेपण मोजले गेले पाहिजे. आता आपल्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये आपलं शून्य कसं मोठं होईल याचा प्रत्येकाने विचार करावा. प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक व्यावसायिकाने विचार करावा.

काय शिल्लक राहणार आहे याचा विचार करू नये. पण मला किती मोठं शून्य निर्माण करता येईल याचा विचार प्रत्येकाने जरूर केला पाहिजे. साहेबांनी जसं करून दाखविलं, एवढं मोठं विश्व निर्माण केलं की त्याच्या दर्शनाने, अनुभवाने हजारो लोकांचं जीवनच बदलून गेलं आहे. शहाणी माणसं आणि वेडी माणसं असाही एक लेख आहे. अनंतराव म्हणतात, शहाणी माणसं कुणाला म्हणायचं? जे स्वतः आपलं घरदार, संसार, नोकरी एवढं करतात; त्याच्यापलीकडे काही बघत नाहीत. इकडेतिकडे कुणाच्या अध्यातमध्यात नसतात. जगायला येतात, जगतात ती शहाणी माणसं. वेडी माणसं कोणाला म्हणायचं तर आपल्या स्वतः च्या जीवनामध्ये चार खस्ता खाऊनदेखील बाकीच्या जगाचं कसं धडभलं होईल यासाठी धडपडत असतात. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धडपडणारी क्रांतिकारी सगळी वेडीच लोकं होती. काय नडलं होतं त्यांना की आपला सुखाचा संसार सोडून ते इंग्रजांकडून आपला देश स्वतंत्र करून घेण्यासाठी लढायचे. हजारो आहेत असे. आता त्या काळामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखा बॅरिस्टर होऊन आलेला माणूस, त्यांनी ठरवलं असतं ना, तर अब्जावधी रुपये मिळविले असते. परंतु ते सोडून दोन वेळा जन्मठेपेची शिक्षा भोगण्याचे ज्याला भाग्य मिळाले, एका अर्थाने वेडेपणा नाही का? विलक्षण वेडेपणाच आहे. पण अशी वेडेपणा करणारी हजारो माणसं ज्या वेळी स्वराज्यात निर्माण होतात ना त्या वेळी समाजजीवन बदलतं. त्या वेळी समाजामध्ये काहीतरी चांगले बदल घडतात. शहाणी

माणसं संख्येने खूप असली तरी ती समाजामध्ये काही बदल घडवू शकत नाहीत. किंबहुना कदाचित झाली तर थोडीफार घसरगुंडीच होते.

कारण त्यांना वाटते, आपल्या समाजाचे काही असेल ते असो, आपण आपलं बघावं! ते आपलेही पाहू शकत नाहीत, आणि समाजाचेही जीवन बदलू शकत नाहीत. झाली तर घसरगुंडीच होते. समाजात चांगल्या बदल घडवायचं असेल, तर तो चांगली वेडी माणसेच घडवू शकतात. मी थोडे धारिष्ट करून म्हणतो, साहेबही असे एक वेड्या माणसांपैकी होते; की ज्यांनी गुरूंच्या शब्दांवरती; हे योग्य आहे की अयोग्य, 'आत्तापर्यंत मी एवढं केलं, मलाच का सांगता, मलाच का दहा काम लावता, माझ्याच का पाठी लागलेत,' असा बोल चुकूनही काढला नाही. त्यांचं म्हणणं योग्य काय, अयोग्य काय, याची तपासणी करायला ते गेले नाहीत. कुठलाही शहाणा माणूस तसाच विचार करणार की हा सांगतोय यात काय शहाणपण आहे? या वाळवंटामध्ये एखादा अंकुर उभा करायला सांगत आहेत, या खडकाळामध्ये काय त्यातून मिळणार आहे? दवाखाना काढायचा तर मुंबईत काढतो ना! पण आपले गुरुजी सांगतात ते एक शहाणपणच आहे. शहाणपणच होते ते! ते काय ॲनालिसिस करत बसले नाहीत. जे करायचं आहे ते त्यांनी करून दाखवलं. त्याच्यासाठी आपलं सगळं आयुष्य झिजले. कणकण देऊन जळतात क्षण-क्षण, अशी दीपकाची उपमा सांगितल्याप्रमाणे ती जगणारी माणसे होती. वेडी माणसं होती. पण याच माणसाने समाज बदलला म्हणून हे एका अर्थाने एक तीर्थक्षेत्र बनलं. आपला भारत ही एक पुण्यभूमी आहे. प्रत्येक कणकण पवित्र आहे.

स्वामी विवेकानंदांचे वर्णन असं करतात, एकदा ते एका परदेशीवारीवरून उतरले तेव्हा भारतभूमीवरती हजारो लोक त्यांच्या दर्शनाला व स्वागताला जमले होते. पण हारतुरे घालून घ्यायच्या भानगडीत ते पडले नाहीत. विवेकानंदानी त्याआधी त्यांच्या अंगावरती तिथली वाळू माती माखून घेतली. सगळे चकित झाले. 'आपण हे काय करता?' असे मग काही लोकांनी त्यांना विचारले, आणि त्या वेळी लोकांना त्यांनी सांगितलं की, मी अशा भोगभूमीमध्ये राहून आलो आहे की कदाचित याचे जर का थोडेफार संस्कार माझ्यावरती झाले असतील तर या पुण्यभूमीचा स्पर्श माझ्या या शरीराला व्हावा आणि ते त्यागाचे संस्कार कुठेतरी माझ्यात परत एकदा जागृत व्हावेत, त्या भोगभूमीच्या संस्कारातून मी मुक्त व्हावे म्हणून मी ही माती उधळून घेतो स्वतःवर! योगी अरविंद यांनी असं सांगितलं होतं की ईश्वराची आराधना कोणी कुठेही केली तरी त्याला योग्य दिशा मिळणार. खरे! पण खरोखर जर मोक्ष मिळण्यासाठी योग्य भूमी कोणती असेल तर ती भारतभूमीच आहे आणि ती पुण्यभूमी आहे. परमेश्वराने त्याचे येथे अधिष्ठानच तयार करून ठेवले आहे.

'पॉल ब्रुंटन' नावाचा लंडन टाइम्सचा एक संपादक, त्या वेळी ब्रिटिशांचे राज्य होते. ही एक जवळजवळ शंभर वर्षांपूर्वीची गोष्ट. आणि हा ब्रुंटन एक महिना सुट्टी काढून भारतात आला. कशा करता आला, तर त्याला इथले भोंदू साधू, इथला धर्माचा जो काही वेडाचार आहे आणि त्यामुळे इथले सगळे लोक मागासलेले कसे राहायचे, याच्यावरती त्याला काही लेखन करायचे होते; आणि म्हणून तो इथल्या वेगवेगळ्या मंदिरांमध्ये गेला. साधू लोकांना जाऊन भेटला आणि सगळीकडे त्याला त्याच्या म्हणण्याप्रमाणे दिसले की इथल्या मंदिरांमध्ये अस्वच्छता आहे. पुरोहित लोक लोकांची लूटमार करतात. अमुक तू काही केले तर पुण्य मिळेल. तू एवढे पैसे दे, एवढे दान दे, अमुक कर याच्या पलीकडे त्याला काही दिसले नाही. त्याला जे कोण साधूलोक सापडले तेसुद्धा साधारणपणे असेच! आणि आता माझा जो सिद्धांत आहे तो १००% खरा आहे. आता मी कसा या भारतीयांचे वाभाडे काढतो बाहेर, असे मांडे रचत त्याच्या बोटीची जी काही वेळ होती ती गाठण्यासाठी म्हणून तो मुंबईच्या दिशेने निघाला.

घडलेली घटना आहे. त्याने स्वतःच सगळं लिहून ठेवलंय. त्याचे स्वतःचे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. एका झाडाखाली त्याला, एक साधू बसला आहे आणि चार-दोन लोकं त्याचे पाय चेपत बसलेत बाजूला, असे दिसले. आधीच माथं भडकलं होतं, की इथे सगळा भोंगळपणा आहे, भोंदूपणा आहे, अमुक आहे, तमुक आहे! थांबवली गाडी त्याने! आणि तो साधूच्या जवळ गेला आणि इंग्लिशमध्येच (त्याला काही स्थानिक भाषा येत नव्हती.) धडाधडा शिव्या द्यायला सुरुवात केली त्याने की तुम्ही असेच आहात, तुम्हीच लोकांना वाईट सवयी लावल्यात, त्याच्यामुळे तुमचा देश मागास राहिलाय वगैरे. आणि मग पुढचे आश्चर्याचे धक्के त्याला बसायला सुरुवात झाली. त्या साधूने त्याला इंग्लिशमध्येच उत्तरे द्यायला सुरुवात केली, की अरे तू काय पाहिले भारतात येऊन? तू काय इथल्या लोकांचे जीवन समजून घेतले? चार ठिकाणी जाऊन तू वरवर काहीतरी पाहून, तू स्वतःचे परीक्षण करायला निघालास. आम्हाला माहीत आहे, तू महिनाभर कुठल्याकुठल्या मंदिरात गेलास, कुठल्या साधूंना भेटलास, अमुक केलंस, तुला ज्ञान देणारा माणूस वेगळा आहे. ते जे तुला भेटले होते, त्यातले सगळेच खरे का खोटे हे मी सांगायला आलो नाही, पण तू ज्यासाठी शोध घ्यायला आलायस ना, तो, त्याचा शोध वेगळा ठिकाणी आहे. आहे का इच्छा तुझी? तो एकदम अहंकाराने उभा राहिला. 'हो माझी इच्छा आहे अजून समजून घ्यायची.' ठीक आहे, म्हणाले, 'अमुकएक ठिकाणी जा. त्याच्याजवळ एक ५०० मीटर उंचावर एक गुंफा आहे. त्या गुंफेमध्ये एक साधू तुझी वाट बघतोय. तो

तुला या सगळ्या गोष्टींचे ज्ञान देईल. आपली बोट चुकेल याचा विचार न करता ब्रुंटन उलट्या दिशेने निघाला. हिमालयाच्या दिशेने. मनालीपासून काही अंतरावरती एक छोटं गाव आणि तिथून पुढे जे चढून जायचे होते, गुंफेपर्यंत तिथे गेला. खरोखर गुहेत साधू त्याची वाट बघत होता. त्याने स्वागत केले इंग्लिशमध्ये त्याच्याशी बोलला. 'तू येणार हे मला माहीतच होतं. मी वाट बघतच बाहेर उभा आहे.'

त्याला कळेना की याला काय टेलीपथी पद्धतीने कळलं की काय? त्या वेळी टेलिफोन नव्हता, काय नव्हता! कसं काय कळणार त्याला? ठीक आहे. त्याला आश्चर्याचे धक्केच बसणारच होते एकामागून एक. त्यांनी त्याला आतमध्ये नेलं. त्याला काही खाऊ-पिऊ घातलं. आणि म्हटलं की इथं राहा. भारतीय साधू काय आहे, भारतीय संस्कृती काय आहे, इथली शक्ती काय आहे हे समजून घ्यायचं आहे ना? इथे राहा. पुढे सहा महिने तो इथे राहिला. त्याने योग साधना केली. अनेक प्रकारच्या अनुभूती त्याला आल्या. त्या सगळ्या विषयांवर आणि त्यानंतर मी भारत कसा पाहिला, त्याच्यावरती त्याचे पुस्तक प्रसिद्ध झालं. त्याने वर्णन केलंय की मला तिथे गेल्यावर अनुभूती आली की भारत ही एक पुण्यभूमी आहे. आणि धर्माच्या नावाने लुटमार करणाऱ्या लोकांचा देश आणि लोकांना अधोगतीला नेणारी माणसं असं वर्णन करत होतो. फार वरच्या पातळीवरती विचार करणारी, चिंतन करणारी, जगाचे सर्व भवितव्य घडवणारी माणसं या ठिकाणी राहतात. आजही या आध्यात्मिक क्षेत्रातील माणसांची ताकद काय आहे हे अनुभवून आलेलो आहे. अशी पुण्यभूमी आहे भारत, तरीही इथे अशी छोटीमोठी तीर्थक्षेत्रं का निर्माण करावी लागतात? सगळी कण-कण या देशाची पुण्यभूमी आहे तरीही अशी छोटी मोठी तीर्थक्षेत्र लागतात कशाला? असं वाटतं, पृथ्वीवरती कुठेही खणलं तरीही पाणी लागणार आहे. आणि जिथे पाणी अगदी जवळ आहे, थोडसं खरडवलं तरी पाणी लागेल अशा काही जागा असतात. तशी काही स्थाने अशी असतात ज्या ठिकाणी चटकन एखाद्या विषयाची प्रचिती येते. तुम्ही केलेल्या प्रयत्नांना, एखाद्या विषयाला यश मिळतं. अशी जी स्थळं आहेत त्यांना पुण्यभूमी किंवा तीर्थक्षेत्र असं म्हटलंय.

मी पुन्हा एकदा सांगतो की हे एक मोठं तीर्थक्षेत्र साहेबांनी आणि श्रीमहाराजांनी उभं केलेलं आहे. कशा अर्थाने आहे, कोणत्या अर्थाने तीर्थक्षेत्र आहे याची पुन्हा काही वेगळा संदर्भ घेऊन मी मांडणी करणार आहे. मी सगळी पहिल्यापासून उदाहरणे दिली त्यात सुसंगती आहे. प्रत्येक वेळी एक वेगळा संदर्भ घेऊन पुन्हा मी त्याच मार्गावर येऊ काय ? लोकमान्यांचे जवळचे सहकारी शिवरामपंत परांजपे हे काळ या नियतकालिकाचे ते संपादक होते. शिवरामपंत अतिशय व्युत्पन्न पत्रकार, अभ्यासू व्यक्ती. लोकमान्य टिळकांनी त्यांच्या कठोर लिखाणाबद्दल एकदा सोडून दोनदा, तीनदा तुरुंगवास भोगला. शिवरामपंतांना कधी शिक्षा झाली नाही कारण ते कधी शब्दात सापडलेच नाहीत. ते असं काही वक्रोक्तीपूर्ण लिखाण करायचे की वाचकांना बरोबर त्यांना काय म्हणायचंय ते कळायचे. याच्यात गुन्हा काय आहे, सरकारच्या विरोधात काय लिहिलंय हे पोलीस अधिकारी कधी सिद्ध करू शकले नाहीत.

त्यांचं एक फार सुंदर पत्र 'काळ'मध्ये प्रसिद्ध झालं होतं. ते पत्र थेट परमेश्वराला उद्देशून लिहिलंय. ते म्हणतात, ''परमेश्वरा, आत्तापर्यंत आम्ही असं ऐकून होतो, एक म्हण शिकत होतो की 'मॅन प्रपोजेस, गॉड डिस्पोजेस!' काहीतरी आम्ही योजना करतो, विचार करतो की असं झालं पाहिजे, तसं झालं पाहिजे वगैरे वगैरे. शक्य तेवढे प्रयत्न करतो त्या दिशेने आणि दैव ते होऊ देत नाही. पण माझी अशी आता खात्री पटली आहे ती म्हणजे आपल्या देशाच्या बाबतीत परिस्थिती पूर्ण वेगळी आहे. काय वेगळी आहे? गॉड प्रपोजेस मॅन डिस्पोजेस! देवाने आपल्या देशासंबंधी काही योजना केली आहे आणि माणूस ती योजना यशस्वी होऊ देत नाही आहे या देशातला. शिवरामपंत म्हणतात, 'अरे या भूमीला काय काय दिलं नाहीस तू? उत्तरेला सगळ्या बाजूंनी भली मोठी उंच तटबंदी उभी करून ठेवलीय, जगातली सगळ्यात उंच, जी ओलांडून कोणीही शत्रू कधी येणार नाही आणि त्यामुळे हा देश परतंत्र होणार नाही असं तुला वाटतं! दुसऱ्या बाजूला खोल खंदक खोदून ठेवलंय सागर, त्याच्यापासून हजारो मैल अंतरापर्यंत दुसरा देश नाही! तुला असं वाटलं हा सागर ओलांडून, एवढा मोठा खंदक ओलांडून कोणी शत्रू इथे येणार नाही आणि आमच्या या लाडक्या समाजाला (परमेश्वराचा लाडका समाज असे ते म्हणतात), भारतभूमीला कोणी परतंत्र करणार नाही! पण तुला काय माहिती आमचे कर्तृत्व? तू एवढ्या भिंती उंच उभ्या करून दिल्यास तरी त्या ओलांडून आम्ही शत्रूला येऊ दिलं आणि त्यांनी एक सोडून बाराशे वर्षेआमच्यावरती राज्य केलं. एवढे मोठे प्रचंड खंदक सागर असताना ते ओलांडून आम्ही शत्रूला येऊ दिलं. त्यांनाच मदत केली आणि आम्ही त्यांचेच दीडशे वर्षे गुलाम झालो. त्यामुळे ही भूमी स्वतंत्र राहावी म्हणून तू किती तटबंदी, सगळ्या व्यवस्था करून ठेवल्यास! तुझी इच्छा काहीही असेल, आमची इच्छा नाही ना तशी! आमची इच्छा पारतंत्र्यात राहावं, गुलाम राहावं, तुझी इच्छा यशस्वी होऊ देऊ नये ! ते म्हणतात, परमेश्वरा तू असा विचार केलास की या देशांमध्ये अतिशय बुद्धिमान माणसं निर्माण व्हावीत. म्हणजे सिंध, पंजाब, काश्मीरचं वर्णन करताना सांगतात असं की सिंध अतिशय श्रीमंत समाजाचा. व्यापार कसा करावा, धन कसं कमवावं हे सिंधी लोकांकडे बघावं. बळ, सामर्थ्य कसं असावं

हे पंजाबी लोकांकडे बघावं. बुद्धिमान माणसं कशी असावीत हे बंगाली माणसांकडे बघावं. सगळ्या प्रकारची कर्तृत्ववान माणसं दिली. या ठिकाणी सगळ्या प्रकारची खनिज संपत्ती दिली. गुजरात आणि राजस्थानमध्ये कुठल्याही प्रकारचं वातावरण नाही असे नाही. सगळ्या प्रकारचं वातावरण आहे आणि सगळ्या प्रकारची कर्तृत्ववान माणसं आहेत. हे सगळं निर्माण करून देणारे एवढे सगळे दिल्यानंतर तुला असं वाटतं हा देश सुखी राहील, समृद्ध राहील, समर्थ बनले. पण ते असं म्हणतात की आम्ही असे कर्तृत्वान आहोत की तू आमच्यासाठी कितीही आणून दिलंस तरी आम्ही दरिद्रीच राहणार, अडाणी राहणार, आम्ही निरक्षर राहणार, आमचं आरोग्य कायम बिघडलेलं राहणार. तू आज कितीही हा समाज चांगला राहावा म्हणून, सामर्थ्यसंपन्न राहावा म्हणून ठरविलेस तरी आम्ही नाही राहणार! तुझ्या इच्छेपेक्षा समाजातील लोकांची इच्छा जास्त प्रबळ आहे. गॉड प्रपोजेस मॅन डिस्पोजेस! सगळं त्यांचं जे पत्र आहे ना ते असं वाचावं! पान पानापानावर जाणवतं की अरे हा माणूस असं दाखवून देतोय की समाजात काय दोष आहेत, किती दोष आहेत आणि हे सर्व दोष घेऊन आपण कसा हा देश स्वतंत्र करणार आहोत? कसं देशाला वैभवशाली बनवणार आहोत? पण शिवरामपंतांचे जे शब्द आहेत ना ते केवळ समाजावरती टीका करण्यासाठी नव्हते. समाजाला जागृत करणे, समाजाला धक्का देऊन पुन्हा कार्य प्रवृत्त करणे याच्यासाठी म्हणून केलेली ही टीका होती.

शास्त्रामध्ये प्रदूषण या शब्दाची खूप चर्चा होते अनेक प्रकारचं प्रदूषण सांगितलं आहे. अन्नप्रदूषण, जलप्रदूषण आहे. वायूप्रदूषण आहे, ध्वनीप्रदूषण आहे. तसंच अजून एक नवीन प्रकारच्या प्रदूषणाचा प्रकार आपल्या इथे आहे, ते आहे वैचारिक प्रदूषण! जसं वागायला पाहिजे तसं न वागता, वेगळ्या पद्धतीने वागलो तर आपली प्रगती होईल अशी वैचारिक धारणा आपल्या समाजाची होऊन गेली. भ्रष्ट विचारातून निर्माण होणारी कृती म्हणजे, भ्रष्टाचार म्हणतात. सध्या भ्रष्टाचार वैचारिक प्रदूषणातून निर्माण झालाय. आमच्या पूर्वजांचा विचार काय? 'हे विश्वची माझे घर!' या सगळ्या जगाला आम्ही एकरस जीवन त्याच्यामध्ये आहे असं म्हणून पाहणार. परमेश्वर सगळीकडे भरून राहिला आहे असे आम्ही म्हणणार, पण सगळ्या जगात परमेश्वर भरून राहिला आहे असं तोंडाने बोलून राहायचं आणि अस्पृश्यता पाळायची, मी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून दुसऱ्याच्या थाळीतलं अन्न ओरबाडून घ्यायचं, कधीतरी स्वतःकडे पैसे जमवायचे, दुसऱ्याचं काय होईल विचार नाही. म्हणायचे सगळीकडे परमेश्वर एकच आहे आणि आम्ही सगळे एकच आहोत असं म्हणायचं एका बाजूने आणि निरनिराळ्या छोट्या गोष्टींवरून, जात असेल, धर्म असेल, एखादी भाषा असेल, कुठंतरी एखादा प्रांत असेल, एखादं राजकीय कारण असेल, वेगवेगळ्या प्रकारे भांडणाची कारणं निर्माण करून आपसात लढाया लढत राहायच्या आणि शत्रूला संधी मिळून द्यायची असं आम्ही करत राहिलो. भ्रष्ट विचारातून आमची सगळी घसरगुंडी सुरू झाली. भ्रष्ट विचार हे मूळ कारण. भ्रष्टाचार हा त्याचा परिणाम. किती टोकाचा भ्रष्टाचार आमच्या समाजात आहे.

म्हणजे आपला समाज हा मागे का राहिला? हे सगळं वर्णन वेगवेगळे शिवरामपंतांनी करून ठेवले. मी त्याचा पुढचा भाग सांगतो. ४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. जवळपास त्याच सुमाराला इस्रायल स्वतंत्र झाला. जवळपास त्याच सुमाराला सिंगापूर वगैरे छोटेमोठे देश दक्षिण पूर्वेतले हे स्वतंत्र झाले. जर्मनी आणि जपान सारखे देश तर, अणुयुद्धामुळे उध्वस्त झाले. जपानवर दोन अणुबॉम्ब पडले आणि जर्मनीची तर अक्षरशः राखरांगोळी केली होती बॉम्बिंग करून. साधारणपणे भारत स्वतंत्र झाला त्या वेळी सगळेजण अशा अवस्थेत होते. आज ७५ वर्षांनंतर आपण मागे वळून बघतो की आमचा समाज कुठे आहे? आमचा देश कुठे आहे? आणि हे देश कुठे आहेत? तर असं लक्षात येतं की एकीकडे राखरांगोळी झालेला जर्मनीसारखा देश आज प्रगत राष्ट्रांमध्ये पहिल्या पाच प्रगत राष्टांमध्ये एक आहे. सगळ्या युरोपच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनून उभा राहिलेला आहे. जपानसारखा अणुबाँबने उध्वस्त झालेला देश आज आम्हाला कर्ज देतोय. आम्हाला तंत्रज्ञान देतोय. वेगवेगळ्या प्रकारे भारतामधल्या उपक्रमांना आम्ही मदत करतो म्हणून पुढे येतोय. भारताने सर्व ठिकाणी मदत करायला पाहिजे या देशांना. आम्हाला मदत करण्यासाठी बाकीचे देश पुढे येत आहेत. चीनसारखा देश आपल्याबरोबरच साधारणपणे स्वतंत्र झाला. तोही महायुद्धामध्ये होरपळून निघालेला. एका बाजूने जपानने, दुसऱ्या बाजूने इतर काही पाश्चात्य देशांनी त्याचे लचके तोडलेले. त्या चीनला अफूचं व्यसन लावून शंभर वर्षे लुटले. पण तो चीन किती वेगाने आमच्यापुढे गेला, तर आमच्या चौपट मोठी अर्थव्यवस्था आहे त्याची.

आम्ही तिथं न जाण्याचं कारण काय? याचं कारण असं आहे की एका बाजूने समृद्धी निर्माण करण्याचा काही प्रयत्न करत असताना, दुसऱ्या बाजूने त्या संपत्तीचा; 'विनाश' शब्द बरोबर नाही, पण चुकीच्या मार्गानी त्याचा विनियोग करण्याचे आम्हीच मार्ग शोधून काढले. ते सगळे मार्ग भ्रष्टाचार या नावाने सांगितले जातात. आज या देशातल्या तीन पंतप्रधानांना, मी कुणाचीच आत्ता नाव घेत नाही. मी सगळी नाव सांगू शकतो. कायकाय घटना घडल्या सगळं सांगू शकतो. तीन पंतप्रधानांना आतापर्यंत भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सत्ता सोडावी लागलेली आहे. चौदा मुख्यमंत्री आतापर्यंत झालेत की ज्यांच्यावर या-ना-त्या कारणामुळे भ्रष्टाचाराचे आरोप झालेत. कुणी सिमेंटच्या गैरव्यवहार केला, कुणी 'लॉटरी'चा गैरव्यवहार

केला, कुणी दारूचा गैरव्यवहार केला. कुणी जंगलातून आलेल्या लाकडाचा गैरव्यवहार केला. कुणी धरणाच्या बांधकामामध्ये भ्रष्टाचार केला असे चौदा वेगवेगळे मुख्यमंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे सत्ताहीन झालेले आहेत. अनेक सैन्यातले आणि शास्त्रीय जगतातले मोठे अधिकारी कुठेतरी परकीय दारू मिळते म्हणून, कुठेतरी तिथली एखादी सुंदर स्त्री एखाद्या व्यक्तीच्या सहवासात आलेली आहे म्हणून, तसेच काहीतरी पैशाच्या आमिषाने आमच्या देशाची गुपिते शत्रूला विकतात म्हणजे छोट्याशा काहीतरी कारणामुळे आपल्या संपूर्ण समाजाचा घात करायला आमच्यापैकी काही माणसे सिद्ध होतात. वरदराजन मुदलियार नावाचा एक कुविख्यात गुंड मुंबईमध्ये होता. साधारणपणे २५-३० वर्षांपूर्वीची घटना आहे. दाऊद इब्राहिम वगैरे थोडे अलीकडचे झाले. हा आणखीन त्याच्या मागचा. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असतानाची गोष्ट. वरदराजन मुदलियार याने एक मोठी दारूची पार्टी आयोजित केली मुंबईमध्ये. त्या दारूच्या पार्टीमध्ये सगळे उद्योजक, काही सिनेनट, मोठे काही व्यापारी असे काही त्यांच्यात होते. काही पोलीस अधिकारीही त्याच्यात सहभागी झाले होते. एसीपी दर्जाचे पोलीस अधिकारीही होते आणि ज्यांच्यावरती मोस्ट वॉन्टेड म्हणून गुन्हेगारीचे शिक्के आहेत असे अनेक गुंड त्या पार्टीत सहभागी झाले होते. त्यांच्या गळ्यात गळे घालून दारू पिऊन हे अधिकारी नाचताना त्याची एक चित्रफीत काढली. फिल्म काढली वरदराजन मुदलियार याने. त्याने हा का उद्योग केला ते माहिती नाही. त्यानेच बोलावलेली सगळी माणसे. त्याची एक प्रत त्याने विधानसभेच्या अध्यक्षांना पाठवली आणि दुसरी प्रत इंडियन एक्सप्रेसला दिली. विधानसभा अध्यक्षांना पाठविल्यावर ते हादरून गेले की अशी पार्टी होते, ओली पार्टी होते. आपल्या उच्च दर्जाचे पोलीस अधिकारी गुन्हेगारांबरोबर नाचताना ह्याच्यात दिसत आहेत.

गंभीर आहे प्रसंग. मुख्यमंत्र्यांना त्यांनी विचारले की काय करावे? मुख्यमंत्री म्हणाले इनडोअर कार्यक्रम घेऊ या आपण. सगळ्यांना एकदा दाखवू या काय आहे ते आणि नंतर मग काय करायचे ते ठरवू. ते सगळं बघितल्यावर पुढे काय कृती करायची कोणाची हिंमतच झाली नाही. तसाच राहिला विषय. इंडियन एक्सप्रेसने ते वृत्त प्रसिद्ध करून टाकले की, अशी फिल्म निघाली आहे आणि आमच्याकडे त्याची प्रत आहे. जर तुम्ही त्यावर काही कृती करणार नसाल तर आम्ही ती फिल्म सगळ्या समाजाला दाखवू. आता लपवून ठेवणे तर शक्य नव्हते. मुख्यमंत्र्यांना निवेदन द्यावे लागले, हो अशा प्रकारची फिल्म आलेली आहे. आम्ही त्याची सत्यता पडताळून पाहत आहोत आणि जर काही खरं असेल तर आम्ही त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करू. विषय संपला, थांबला, पुढे काय झाले नाही. राजभवनातून अंमली पदार्थ घेऊन येणारा एक ट्रक एकदा पकडला पोलिसांनी. नेमका जो अधिकारी होता त्याला माहीत नसेल कदाचित की असे काही करायचे नसते म्हणून! हे आरोपी पकडायचे नसतात; परंतु पकडला. तो ड्रायव्हर वगैरे पळून गेला असं सांगितलं गेलं. त्याच्यावर खटला दाखल झाला. चर्चा झाली विधानसभेत. त्या वेळी त्या अधिकाऱ्याने, मंत्र्यांने सांगितलं, की तो ड्रायव्हर पळून गेला, नंबर प्लेट बोगस होती, त्यामुळे मालक कोण कळत नाही, काही नाही. मग आमदारांनी विचारले की चॅसी नंबर असतो की नाही, त्या चॅसी नंबर वरून मायबाप कळतात की नाही त्या ट्रकचे कोण आहेत ते ? त्याच्यावरून सापडलं की नाही कोण गुन्हेगार होता ? सांगितलं, की आम्ही त्याचा नक्की शोध घेतो. पुढे काही झालं नाही. एक-ना-दोन अशी शेकडो उदाहरणं मला सांगता येतील, की जी तुमच्या-माझ्यातल्या कर्तृत्ववान मानल्या जाणाऱ्या माणसांनी केलेली आहेत. असा काळा पैसा जमवल्यावरती कधीतरी धाड पडते आणि मग सगळ्या घराचं खालचं तळघर नोटांनी भरलेलं सापडतं अशी वर्णन वाचतो आपण. काय एवढे पैसे जमवून करणार आहात काय? पुढच्या सात पिढ्या खाऊ शकतील, याच्यापेक्षाही जास्त पैसे आहेत. माणूस खाऊन-खाऊन खाणार काय, डाळ आणि तांदूळच ना! की नाणी खाणारे ! ते काय खाऊ शकत नाही; मग एवढा लोभ आणि दुसऱ्याच्या ताटातलं ओढून घेण्याची ही वृत्ती समाजामध्ये का निर्माण होते आहे?

ही मानसिक विकृती आहे, वैचारिक विकृती आहे. आमची मूळ संस्कृती काय आहे, हे 'मी'पणाचं माझं वर्तुळ वाढतवाढत सर्व समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, विश्वापर्यंत पोहोचले पाहिजे, ही वैचारिक संस्कृती बाजूला ठेवून ही विकृती निर्माण होते, म्हणजे काय? मी, माझं कुटुंब, भोवतालचे चार मित्र एवढंच माझं मीपण आहे, बाकीचं कोणी माझं नाही, माझं काही त्यांच्याशी नातं लागत नाही, माझा काही त्यांच्याशी संबंध नाही आणि म्हणून त्यांच्या सुखदुःखांशी मी जोडलेला नाही, असा विचार करणारी विकृती आहे. ही पाश्चात्य भोगवादी संस्कृतीतून आलेली विकृती आहे; की ज्या विकृतीने जवळजवळ अर्ध्या समाजाला आजवर पछाडलं आहे. आमच्या देशाच्या तीन राष्ट्रपतींनी आजवर वेगवेगळ्या अशा संदर्भांमध्ये म्हटलं आहे; की आमच्याकडे काही कमी नाही, कोणत्या गोष्टीची. भरपूर पैसा देशात आहे, देशात गरिबी खूप आहे; पण देश गरीब नाही; पण तो पैसा योग्य ठिकाणी नाही. उत्तम योजना करणारी माणसं आमच्याकडे आहेत; पण एकही योजना यशस्वी होत नाही आणि त्यामुळे देशाचा विकास होत नाही, याचं कारण देताना ह्या तिघांच्याही बोलण्यातील शब्दरचना वेगळी असली, तरी आशय एकच होता आणि दुर्दैवाने ते वाक्यही एकच होतं 'We have a Crisis of Character.' आमच्याकडे चारित्र्याचा

अभाव आहे. चारित्र्याचा अभाव आहे, हे वाक्य आणखीन एका संदर्भामध्ये मी सांगतो.

९१ साली ज्या वेळी सोवियत प्रजासत्ताक कोसळून पडलं. 'ग्लास्त्नोस आणि पेरिस्त्राइका'च्या घोषणा दिल्याबरोबर. त्यानंतर त्या वेळच्या रशिया राज्याचे गोर्बाचेव्ह यांचा पुढे काही प्रवास झाला युरोपमध्ये, त्या वेळी त्यांना विचारलं की एवढी मोठी महासत्ता एकदम कशी काय कोसळून पडली? एकदम कसे काय तुकडे पडले? लढाई केली नाही, काय झालं नाही, आपोआप विघटन झालं कसं? गोर्बाचेव्हनी उत्तर दिलं, ' We have crisis of character' चारित्र्याचा अभाव याच्यामुळेच आपलं प्रजासत्ताक कोसळलं. त्याची अनेक उदाहरणं गोर्बाचेव्ह यांनी दिली. आमच्या सैन्यामध्ये भ्रष्टाचार कसा होतो? आमच्या न्यायव्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार कसा होतो? आमच्या वेगवेगळ्या यंत्रणा कशा पोखरल्या गेल्या होत्या आतून, आणि त्यामुळे थोडं स्वतंत्र मिळाल्याबरोबर या सगळ्या प्रवृत्ती उफाळून बाहेर आल्या. आणि ह्या देशाचं लोक काही रक्षण करू शकले नाही. जर आपले राष्ट्रपतीच एका मागून एक असं म्हणतात, We have crisis of character, काय होईल आपल्या देशाचं ? काय होईल आपल्या समाजाचं? काँग्रेसच्या शताब्दी वर्षामध्ये मुंबईमध्ये भाषण करताना राजीव गांधी म्हणाले होते, एक रुपया आम्ही देशाच्या विकासासाठी दिला, १२ पैसे जेमतेम त्या कामासाठी लागतात. ८८ पैशाचे काय होते मला कळत नाही. ही आज आमची दुर्दैवाची अवस्था आहे. आणखीन शंभर वर्षांपूर्वी काय, १५० वर्षांपूर्वी या देशातला एक महापुरुष अमेरिकेमध्ये गेला होता. शिकागोमध्ये सर्वधर्म परिषदेमध्ये भाषण करण्यासाठी गेला होता. स्वामी विवेकानंद! शिकागोच्या रस्त्यावर भगवे कपडे घालून चालणारा माणूस कधीच काय पाहिला नव्हता लोकांनी. त्यामुळे पोरंटोरं टिंगल करत मागे फिरत होती. ती पोरंटोरं मागे फिरतात म्हटल्यावर विवेकानंद हसत होते. त्यांच्याशी गप्पागोष्टी करत होते. जोरजोरात हसत होते. मुलांना काय बोलायचं! एक-दोन अमेरिकन गृहस्थ समोरून येताना दिसले. त्यातला एक जण दुसऱ्याकडे बघून म्हणाला, "See, how funny that fellow looks, any how he doesn't seem to be a gentleman.' विचित्र कपडे घालून कुणीतरी माणूस आला आहे. कोणी सभ्य गृहस्थ नाही वाटत आहे. एकदम विवेकानंद थांबले, त्यांच्याजवळ गेले आणि म्हणाले, ''See, you seem to be in a country where tailor makes man a gentleman.'' तुम्ही अशा देशातले दिसता ज्या ठिकाणी शिंपी माणसाला सभ्य गृहस्थ बनवतो. कपडे कसे आहेत त्याच्यावर माणसाची सभ्यता ठरते. ''I represent a country where characters makes a man gentleman.'' जिथे चारित्र्य माणसाची सभ्यता ठरवतं अशा देशातून मी आलोय. ही उद्घोषणा करणाऱ्या स्वामी विवेकानंदाच्या देशामध्ये असं म्हणायची वेळ यावी. We have crisis of character, काय चुकतं नेमकं?

नेमकं हेच चुकत आहे की आमची जी मूळ संस्कृती आहे, धर्म म्हणजे केवळ उपासना पद्धती, पूजा पद्धती नाही. या मंदिरात दर्शन घ्यायला जावं का, अमक्या ठिकाणी उपास करावा का, अमका यज्ञ करावा का, म्हणजे धर्म नाही! धर्म ही व्यापक कर्तव्य भावना आहे जी व्यक्ती, समाज, सृष्टी, परमेष्टी या सगळ्यांना व्यापणारी कर्तव्यभावना आहे आणि ती कर्तव्यभावना आम्ही विसरलो, म्हणजे धर्म विसरलो. त्या धर्माची पुन्हा नीट जाणीव, योग्य प्रकारे समाजाला परत करून देणं हीच गरजेची गोष्ट आहे. तर पुन्हा एकदा जी आमची मूळ संस्कृती होती, सर्व विश्व परमेश्वराने भरलंय आणि म्हणूनच सर्व विश्व एक आहे. सगळ्या विश्वाला आम्ही आर्य बनवून दाखवू म्हणजे चांगलं करून दाखवू ती उर्मी, ते सामर्थ्य पुन्हा निर्माण करण्यासाठी या धर्मसंकल्पनेची जाणीव होणे गरजेचे आहे. संत-महात्मे नेमकं हेच करत असतात. 'जगाच्या कल्याणा संताची विभूती' असे म्हटलेलं आहे की नाही? म्हणजे काय करतात? जगाचं कल्याण करतात. म्हणजे संत काय करतात? समुत्कर्ष आणि नि:श्रेयस असे संघाच्या प्रार्थनेत दोन शब्द आहेत. समुत्कर्ष याचा अर्थ भौतिक विकास. अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या प्राथमिक गरजा असतील किंवा अजून पुढे जाऊन सांगायचं असेल तर शिक्षण, आरोग्य, रोजगार, संस्कार यासारखे आवश्यक विषय असतील या सगळ्या योग्य प्रकारे भागाव्यात, समाजातल्या प्रत्येक घटकाच्या भागाव्यात, असा समुत्कर्ष आहे. भौतिक विकासाचा भाग आहे आणि नि:श्रेयस म्हणजे पुढे जाऊन माझं कुठेतरी या विश्वाशी नातं आहे, माणसाशी नातं आहे, आम्ही एक आहोत आणि मला माझ्या जीवनाचा काहीतरी मोठा भाग या देशासाठी, समाजासाठी, परमेश्वरासाठी खर्च करायचाय, ही प्रेरणा जागृत होणं हे नि:श्रेयस आहे. ते अध्यात्म आहे, वेगळ्या अर्थाने आणि म्हणून समुत्कर्ष आणि नि:श्रेयस या दोन्हींचा विकास घडवणारे संत, या दोन्ही मार्गानी त्या प्रत्येक व्यक्तीचं आणि त्या व्यक्तीने बनवलेल्या समाजाचं ही कल्याण करत असतात. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' याचा हा अर्थ आहे. समुत्कर्ष आणि नि:श्रेयस या दोन्हीची प्राप्ती करून देणं, या दोन्हींचा काहीतरी योग्य संदेश पोहोचवणं, हे काम ते संत करत असतात आणि ज्या ठिकाणी या संतांचा निवास असतो, ज्या ठिकाणी त्यांचं कार्य केंद्रित झालेलं असतं, तिथे अशी तीर्थक्षेत्रं तयार होतात की त्या तीर्थक्षेत्रांचं वातावरणच असं असतं की तिथे आलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये तशा प्रकारच्या कृती करण्याची भावना निर्माण व्हावी. मी एक शास्त्राचा विद्यार्थी आहे त्यामुळे नेहमी शास्त्रातली उदाहरणे देत असतो.

विजेची तार स्वत:भोवती एक चुंबकीय क्षेत्र निर्माण करत

जाते. करंट निर्माण झाला की त्याच्याभोवती मॅग्नेटिक फिल्ड तयार होते तशी कर्तृत्ववान माणसं जिथे-जिथे समाजात येऊन उभी राहतात त्यांच्या भोवतालच्या समाजामध्ये ते आपल्या प्रकारचे कर्तृत्व प्रवर्तित करत असतात. योग्य प्रकारे वागणं ज्यांच्या स्वभावामध्ये आहे, ज्यांच्या सहजकृतीतून आहे अशा माणसांच्या संपर्कामध्ये भोवतालचा समाजही योग्य प्रकारे वागण्याचा प्रयत्न करतो. ते काम संत करत असतात की त्यांच्याकडे बघून भोवतालचा समाज आपण असं वागलं पाहिजे, असं बोललं पाहिजे, असा व्यवहार केला पाहिजे हे शिकतो. कर्तृत्ववान व्यक्तींच्या सहवासात समाजात आपोआप बदल होत जातात. ही कर्तृत्ववान व्यक्ती किंवा हे संत एकटेदुकटे असून चालत नाहीत तर या संतांची मांदियाळी निर्माण व्हावी लागते. समाजामध्ये तसं एक फार मोठं वातावरण तयार व्हायला लागतं. त्याचा जो एक अहर्निश प्रयत्न सगळ्या देशात हजारो वर्षांपासून चालू आहे त्यामुळे हजारो वर्षे आपल्या देशावर आक्रमणं झाली, अनेक प्रकारचा विध्वंस देशात घडला तरी देशातल्या प्रत्येक व्यक्तीचं मनोबल टिकून राहिलं; ते या संतांनी निर्माण केलेलं जे काही एक सामर्थ्य होतं, त्या विद्युत प्रवाहाच्या भोवताली जे निर्माण होणारं मॅग्नेटिक फिल्ड होतं ना, तसं या सगळ्या समाजामध्ये एक दुर्दम्य सामर्थ्य निर्माण होऊन राहिलं की ज्याच्यामुळे या आपत्कालीन परिस्थितीतही समाज टिकून राहिला. दुसरंही खरं आहे की त्या चुंबकीय क्षेत्रामध्ये जर तार संचार करायला लागली तर त्या तारेतही विद्युतधारा निर्माण होते. तसे ज्या क्षेत्रामध्ये ज्यांनी अपरंपार कष्ट केलेले आहेत, परिश्रम केलेले आहेत, ज्यांनी काही एक फार मोठी साधना ज्या ठिकाणी केलेली आहे त्या साधनेच्या क्षेत्रामध्ये जाऊन छोटं-मोठं कामसुद्धा करायचं जे प्रयत्न करतात ना त्यांना त्या साधनेच्या वातावरणामुळे प्रत्यक्ष तसे करण्याची ऊर्जाच निर्माण होते. मॅग्नेटिक फिल्डमधून इलेक्ट्रिक करंट तयार होतो. ऊर्जा निर्माण करण्याचं सामर्थ्य अशा तीर्थक्षेत्रांमध्ये असतं की त्या वातावरणाचा परिणाम म्हणूनच तिथं वावरणाऱ्या प्रत्येक माणसांमध्ये अशी ऊर्जा निर्माण होते की आपण असं काहीतरी केलं पाहिजे आणि म्हणून डेरवणसारखं जे तीर्थक्षेत्र श्रीमहाराजांनी किंवा वालावलकर साहेबांनी निर्माण करून ठेवलेलं आहे अशी ही जागोजागी निर्माण व्हावीत. आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यांमध्ये अशी तीर्थक्षेत्रं निर्माण व्हावीत की जी समुत्कर्ष म्हणजे भौतिक विकास आणि नि:श्रेयस म्हणजे व्यक्तीच्या विचारसरणीमध्ये बदल घडवून आणणं, भोगवादी विचारसरणीतून त्यागाच्या विचारसरणीकडे जाण्याची काहीतरी एक जाणीव निर्माण करून देणं याच्यासाठी प्रवृत्त होतील; असं सगळ्या देशभर घडत राहिलं पाहिजे. आमच्या समाजाला कुठेतरी महासत्ता बनवण्यासंबंधात अनेक जण चर्चा करतात. भारत आर्थिक महासत्ता होईल, भारत लष्करी महासत्ता होईल, भारत कुठेतरी एका अत्युच्च पदावर जाऊन पोहोचेल वगैरेवगैरे. दीनदयाळ उपाध्यायांनी याचं खूप सुंदर शब्दांमध्ये वर्णन केलं आहे की या सगळ्या महाशक्ती, अमुक तमुक त्या सगळ्यातलं नेमकं मर्म सांगायचं तर अगदी सोपं आहे. काय नेमकं करायचंय?

ज्या वेळी या देशातल्या शेवटच्या रांगेमधल्या शेवटच्या माणसांमध्ये; (रांग कशी मोजायची? वेगवेगळ्या पद्धतीने मोजता येईल. जातीची उतरंड असेल तर सगळ्यात कनिष्ठ जात असेल ती त्या शिडीवरची शेवटची पायरी आहे. शेवटच्या रांगेतला शेवटचा माणूस पैशाच्या दृष्टीने मोजलं तर सर्वात जो गरीब आहे, ज्याला दोन वेळेला खायलाही मिळत नाही, त्यातली ही कदाचित अधिक वंचित व्यक्ती जी कोण असेल ती. शिक्षणाच्या दृष्टीनं बघितलं तर ज्याच्या काही पिढ्या कधी शिकल्याच नाहीत, शिक्षणाचा ज्यांना कधीच स्पर्श झालेलाच नाही अशा अशिक्षितातला अशिक्षित माणूस. वेगवेगळ्या पद्धतीने मांडता येईल समाजाची उतरंड. आर्थिक दृष्टीने असो, शैक्षणिक दृष्टीने असो, कुठल्याही संस्काराच्या दृष्टीने असो, जातीच्या दृष्टीने असो, कुठल्याही पद्धतीने मांडणी करा!) दीनदयाळजी सांगतात, आपल्या समाजाच्या शेवटच्या रांगेतला शेवटचा माणूस ज्या वेळी आपल्या स्वतःच्या सर्व गरजा भागवून समाजाला काहीतरी देण्याच्या स्थितीत येईल, सगळ्या गरजा भागल्याच पाहिजेत, प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र, निवारा मिळालाच पाहिजे, शिक्षण, आरोग्य, रोजगार, संस्कार प्रत्येकाला मिळालाच पाहिजे; त्या सगळ्या गरजा भागवून समाजाला काहीतरी देण्याच्या स्थितीत ज्या वेळी येईल त्या वेळी आमचा देश अतिउच्च वैभवाच्या शिखराला पोहोचला असं म्हणायला हरकत नाही, असं शेवटच्या माणसाचं मनोगत सांगतात. सर्वात वरच्या माणसाला काय मिळालं असेल ते सोडून द्या. शेवटचा माणूस ज्या वेळी या स्थितीत पोहोचलेला असेल की स्वतःच्या सगळ्या गरजा भागवून समाजाला काहीतरी देण्याच्या स्थितीत तो येईल (म्हणजे मानसिक बदल देखील त्याच्यात अपेक्षित आहे) तेव्हा आपण योग्य त्या स्थितीत पोहोचलेलो असू. भारताला विश्वगुरू बनवण्याचा संबंधात अनेकदा चर्चा करतो. म्हणजे काय? विश्वाचा गुरू भारताला कशाकरिता म्हणायचं? कोणत्या अर्थाने भारत विश्वगुरू होईल? भारत आर्थिक दृष्ट्या समृद्ध असेल तर त्याला विश्वगुरू म्हणतील लोक? भारत काहीतरी लष्करी महासत्ता घडली तर विश्वगुरू म्हणतील? अजिबात शक्यता नाही! कारण महासत्ता हिटलरची असो, नेपोलियनची असो, आणखीन बाकीची कुठलीही असो; त्या अमेरिकेसारखी आर्थिक महासत्ता आहे, ती काही जगाला सुखी समृद्ध नाही बनवू शकली! जगाला सुखी आणि समृद्ध बनवण्याचे मार्ग आमच्या संस्कृतीने दिले. योग, आयुर्वेद, संगीत, अध्यात्म आणि कुटुंबव्यवस्था या पाच संकल्पना भारताने जगाला दिलेल्या आहेत. यातील प्रत्येक गोष्ट सर्व जगाला सुखी, सुसंस्कृत, समृद्ध करायला समर्थ आहे. ज्या परंपरा भारताने निर्माण केल्या, ज्या अन्यत्र कुठेही नाहीत, त्या परंपरा

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५ ६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

भारताने सगळ्या जगाला द्याव्या. जगाला देण्यासाठी स्वतःमध्ये आधी त्या रुजवाव्या, दुर्दैवाने आमच्याच देशामध्ये या सगळ्या मूलभूत कल्पनांची फार मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. पण या सगळ्या गोष्टींचा आम्ही आधी अभ्यास करावा. आम्ही त्या रुजवून घ्याव्या आणि सर्व जगाला या संकल्पना शिकवाव्यात, तर भारत विश्वगुरू म्हणून मानला जाईल, कारण या संकल्पना दिल्यामुळे जगातील युद्ध संपतील. संघर्ष संपतील. एक सुखी, सुसंस्कृत आणि समृद्ध समाज सर्व जगभर निर्माण झालेला असेल. ते करण्याचे सामर्थ्य आमच्या अंगी यावं याच्याकरिता आधी मी सांगितलं तशी जागोजागी अशा प्रकारची तीर्थक्षेत्रं निर्माण झाली पाहिजेत. समुत्कर्ष आणि निःश्रेयस समाजाला देणारी आणि त्यातून समाजाच्या अंतर्गत परिवर्तन घडवून आणणारी अशी केंद्रं निर्माण होण्याची आवश्यकता आहे. समाजाच्या लहान-मोठ्या गरजा भागवणाऱ्या छोट्या-मोठ्या संस्था निर्माण होण्याची आवश्यकता आहे. १४० कोटींचा समाज आहे तर १४० कोटी समस्या समाजात आहेतच. गरजा आहेतच. त्यामुळे समाजाची एक-एक छोटी गरज घेऊन ती भागवण्याचा प्रयत्न करत राहणे हे परमेश्वरी कार्यच आहे. ज्या वेळी आम्ही समाजाच्या ह्या गरजा भागवू तेव्हा कुठे त्यातला प्रत्येक जण दुसऱ्याला देण्याच्या मानसिकतेत येईल. तोपर्यंत नाही येणार. दीनदयाळजींचे शब्द जर खरे व्हायचे असतील तर समाजाच्या सगळ्या गरजा भागवण्यासाठी तेवढी ऊर्जा आम्हाला निर्माण करून घ्यावी लागेल. ते करण्याचं सामर्थ्य आमच्या संतांच्यामध्ये आहे. हजारो वर्षांपासून त्यांनी अनेक प्रसंगांमध्ये सिद्ध करून दाखवलेले आहे आणि याही ठिकाणी ते साकार होताना आपण पाहतो आहोत. असं कुठतरी प्रत्यक्षात आकारात येताना ज्या वेळी पाहायला मिळतं, तेव्हा विश्वास वाटतो की आज जर शिवरामपंत असते तर त्यांना सांगता आलं असतं आम्हाला की तुमचे शब्द नाही खरे होऊ देणार आम्ही, God proposes and man disposes असं नाही होणार. या देशात संपूर्ण परिवर्तन घडवणारी जी एक शक्ती जागृत होत आहे, समुत्कर्ष आणि निःश्रेयस समाजाला घडवणारी शक्ती या ठिकाणी उदयाला येत आहे आणि अशी शक्ती ज्या वेळी उदयाला आलेली दिसेल त्या वेळी कुठलेही शिवरामपंत पुन्हा म्हणू शकणार नाहीत, God proposes and man disposes! या देशाचं आणि जगाचं भवितव्य बदलण्याची आपली नियतीने दिलेली जबाबदारी आपण पार पाडू. धन्यवाद!''

सौ. सोनाली जोशी यांनी आभार व्यक्त केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.



मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०